रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ९१
www.ramprahar.com

गुरुवार, १७ ऑक्टोबर २०२४ ◆पाने ८◆किंमत ₹२

## अंतरंग

परशुराम घाटात मातीचा भराव गेला वाहून/२
'माथेरानची राणी' यंदाही उशिराने धावणार/७
आंतरशालेय मैदानी स्पर्धेत सीकेटी विद्यालयाची बाजी/८

## न्यायदेवतेच्या डोळ्यावरील काळी पट्टी हटवून हाती संविधान



**नवी दिल्ली :** भारतातील कोणत्याही न्यायालयात न्यायदेवतेची मूर्ती दिसते. न्यायदेवतेच्या हातात तराजू, तलवार असते आणि त्याचबरोबर तिच्या डोळ्यांवरपट्टी दिसते. आता भारतातील न्यायदेवतेच्या डोळ्यावरील पट्टी हटवण्यात आली असून हातात तलवारीच्या ऐवजी संविधानाची प्रत आहे. सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी यासंदर्भातील बदलांसाठी पुढाकार घेतला होता. आता त्यांच्या आदेशानुसार न्यायदेवतेच्या मूर्तीत बदल करण्यात आले आहेत. सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या ग्रंथालयासमोर न्यायदेवतेची नवी मूर्ती लावण्यात आली आहे. आधीच्या मूर्तीवर डोळ्यांवर पट्टी लावलेली असायची आणि एका हातात तराजू आणि दुसऱ्या हातात तलवार असायची. नव्या मूर्तीच्या डोळ्यांवरील पट्टी हटवली गेली आहे तसेच हातात तलवारच्या ऐवजी संविधानाची प्रत दिसते. **(पान २ वर..)**

# 'लाडकी बहीण'च्या विरोधकांचा करेक्ट कार्यक्रम होणार -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

महायुती सरकारने आर्थिक दुर्बल घटकातील महिलांसाठी राज्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना अंमलात आणली. या योजनेंतर्गत आतापर्यंत दोन कोटींहून अधिक महिलांच्या खात्यात पाच महिन्यांचे हप्ते जमा झाले आहेत. या योजनेला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. जर का कोणी लाडकी बहीण योजनेला धक्का लावण्याचा प्रयत्न केला तर त्यांचा एकदम करेक्ट कार्यक्रम होणार, असा इशारा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांना दिला आहे.





राज्यातील विधानसभा निवडणुकीची घोषणा झाली आहे. त्यानंतर बुधवारी (दि.१६) महायुती सरकारच्या काळात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संयुक्त परिषदेत महायुती सरकारच्या कामाचा लेखाजोखा सर्वांसमोर मांडण्यात आला आणि विरोधकांवर जोरदार टीका करण्यात आली.

एकनाथ शिंदे म्हणाले, महायुती सरकारने दोन ते सव्वा दोन वर्षांच्या कार्यकाळात असंख्य कामे केली आहेत. केलेल्या कामाचे रिपोर्ट काढायला हिम्मत लागते आणि ती हिम्मत महायुती सरकारकडे आहे. पायाभूत सुविधांमध्ये महाराष्ट्र हा पहिल्या क्रमांकावर आहे. आम्ही एवढी कामे केली की ती रिपोर्ट कार्डमध्येही सामावत नाहीत. अटल सेतू, समृद्धी महामार्ग, कोस्टल रोडचे काम सरकारने केले आहे. महाविकास आघाडीच्या काळात विकासकामांना ब्रेक लागला होता. अडीच वर्षांमध्ये महाविकास आघाडी सरकारने प्रकल्प बंद करण्याचे काम केले. महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर होता, पण महायुतीचे सरकार येताच महाराष्ट्र तिसऱ्या स्थानावरून पहिल्या क्रमांकावर आला, असा दावा मुख्यमंत्री शिंदे यांनी केला आहे.

राज्यातला सर्वसामान्य माणूस, कॉमन मॅन त्याच्या आयुष्यात बदल झाला पाहिजे. तो कॉमन मॅन नव्हे सुपरमॅन व्हायला पाहिजे. राज्यातील सर्वसामान्य माणसाला आम्हाला ताकद द्यायची आहे, म्हणून तर आम्ही मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केली. मेट्रो प्रकल्पाला स्थगिती दिल्याने १७ हजार कोटी रुपये जास्त खर्च झाले. अन्यथा आम्ही लाडक्या बहिणींना अधिक पैसे देऊ शकलो असतो. लाडकी बहीण योजनेसाठी आमचे लक्ष्य दोन कोटी ५० लाख रुपये होते. आता सुमारे दोन कोटी ३० लाख महिलांच्या खात्यात पैसे गेले. नोव्हेंबर महिन्यात आचारसंहिता लागू होणार हे माहीत होते, म्हणून ते पैसे ऑक्टोबर महिन्यात देऊन टाकले, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

राज्याची तिजोरी लाडकी बहीण योजनेसाठी रिकामी केल्याचा दावा विरोधकांकडून करण्यात येतोय. तर या योजनेसाठी पुरेशी तरतूद केल्याचं सरकारचे म्हणणे आहे. दरम्यान, ही योजना बंद व्हावी याकरता कोर्टातही याचिका दाखल करण्यात आली आहे. यावरून राज्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी विरोधकांवर टीका केली आहे.

आम्ही आलो की सर्व योजना बंद करणार. जेलमध्ये टाकणार. पोलखोल करणार, असे विरोधक म्हणत आहेत, पण कोणाला जेलमध्ये टाकणार? योजना बंद करणार? तुमची पोलखोल झाली आहे. कोविडमध्येच तुमची पोलखोल झाली. काहीजण तर जेलमध्येही गेले. या सर्व योजना बंद करणाऱ्यांना जनता साथ देणार नाही, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

### विरोधक गोंधळलेले –उपमुख्यमंत्री फडणवीस

प्रत्येक योजनेच्या पाठिशी पूर्ण आर्थिक पाठबळ उभे करूनच आम्ही योजना जाहीर करू, मात्र विरोधक गोंधळले आहेत त्यामुळे लाडकी बहीण योजना बंद करावी असे त्यांना वाटते, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. उद्धव ठाकरे यांचे अडीच वर्षे सरकार होते. त्या काळात त्यांनी आधीच्या सरकारने घेतलेले निर्णय रद्द केले. आताही ते तसे करू शकतात. त्यांचे सरकार हे स्थगिती सरकार होते. आताही तसेच काहीतरी करण्याची त्यांची योजना आहे, परंतु ते त्यात यशस्वी होणार नाहीत, असेहीही फडणवीस म्हणाले.

### 'आम्ही जे बोलतो ते करतो, मराठा आरक्षण मी स्वत: देणार'

आम्ही जे बोलतो ते करतो, मी स्वत: मराठा समाजाला आरक्षण देणार, तेही ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता, असा शब्द मुख्यमंत्री शिंदे मराठा आरक्षणासंदर्भात विचारण्यात आलेल्या प्रश्नाला उत्तर देताना दिला. मराठा समाजाला महायुतीने सारथी दिले, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ दिले. कोणी वंचित ठेवले आणि कोणी दिले, याचा विचार मनोज जरांगे यांनी करायला हवा, असे मुख्यमंत्री म्हणाले.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी नव्याने बनले भाजपचे सक्रिय सदस्य

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



भाजपने बुधवार (दि.१६) पासून सक्रिय सदस्यत्व अभियान सुरू केले आहे. य़ाअंतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पहिले सक्रिय सदस्यत्व घेत या अभियानाची सुरुवात केली. पक्षाध्यक्ष जे. पी. नड्डा, राष्ट्रीय सरचिटणीस आणि सदस्यता अभियान प्रमुख विनोद तावडे या वेळी उपस्थित होते.

भाजपने सदस्यत्व मोहिमेच्या माध्यमातून अधिकाधिक लोकांना पक्षात सामावून घेण्याची मोहीम सुरू केली आहे. बुधवारपासून सुरू झालेली ही मोहीम ३१ ऑक्टोबरपर्यंत चालणार आहे. या अंतर्गत जो पक्ष कार्यकर्ता ५० किंवा त्याहून अधिक लोकांना पक्षात सहभागी करून घेईल, त्याला पक्ष सक्रिय सदस्य बनवेल. सक्रिय सदस्य होण्यासाठी कोणत्याही कार्यकर्ता किंवा नेत्याला सक्रिय सदस्यता अर्ज भरावा लागेल आणि नमो ॲपवर १०० रुपये सदस्यता शुल्कही भरावे लागेल.

## हरियाणा विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी नायब सिंह सैनी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

हरियाणात भाजपने विधिमंडळ पक्षाच्या नेत्याची निवड केली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या बैठकीत नायब सिंह सैनी यांची विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी एकमताने निवड करण्यात आली. हरियाणामध्ये गुरुवारी (दि.१७) नवीन सरकारचा शपथविधी सोहळा होणार आहे.

नायब सिंह सैनी यांची मुख्यमंत्री पदासाठी नियुक्ती केल्यामुळे पक्षाचे नेते अनिल विज आणि राव इंद्रजित सिंह हे नाराज असल्याच्या चर्चा सुरु होत्या. दोन्ही नेत्यांकडून अनेकदा मुख्यमंत्री होण्याचा दावा केला जात होता. यादरम्यान अमित शाह यांनी स्वतः लक्ष दिले आणि निरीक्षक म्हणून अमित शाह हे विधीमंडळ पक्षाच्या बैठकीत उपस्थित होते. या बैठकीत त्यांनी एकतेचा संदेश दिला.

२०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याचा संकल्प पुढे नेण्यासाठी हरयाणाच्या जनतेने वचन दिले आहे, असे सैनी यांनी सांगितले.

## पेट्रोल टँकरचा स्फोट; ९४ ठार

**नवी दिल्ली :** नायजेरियामध्ये पेट्रोल टँकरमध्ये झालेल्या भीषण स्फोटात ९४ जणांचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या घटनेत मृतांची संख्या आणखी वाढण्याची भीती आहे. ५० जण गंभीर जखमी झाले असून रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे.

ही घटना उत्तर नायजेरिया येथील जिगावा राज्यातील एका गावातील आहे. पेट्रोल टँकरचा अपघात झाला होता. पेट्रोलची गळती सुरू झाली. या वेळी पेट्रोल गोळा करण्यासाठी लोकांनी गर्दी केली. या वेळी अचानक मोठा स्फोट झाला. या स्फोटात ९४ जणांचा मृत्यू झाला.

## निवडक

### शेतकऱ्यांना दिवाळी भेट! रब्बी पिकांच्या 'एमएसपी'मध्ये वाढ

**नवी दिल्ली :** देशातील कोट्यवधी शेतकऱ्यांना केंद्र सरकारने दिवाळी भेट दिलीय. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत सहा रब्बी पिकांसाठी नवीन किमान आधारभूत किंमत (एमएसपी)मध्ये मोठी वाढ करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. यातगव्हू, हरभरा, मसूर, मोहरी, जव आणि सूर्यफूलच्या बियांच्या एमएसपीत वाढ होणार आहे. सरकार यासाठी ८७,६५७ कोटी रुपये खर्च करणार आहे.

### ओमर अब्दुल्लांनी घेतली मुख्यमंत्रिपदाची शपथ

**श्रीनगर :** नॅशनल कॉन्फरन्सचे (एनसी) उपाध्यक्ष ओमर अब्दुल्ला यांनी बुधवारी (दि.१६) जम्मू–काश्मीरच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. ते केंद्रशासित प्रदेशाचे पहिले मुख्यमंत्री ठरले. काँग्रेसने सरकारमध्ये सहभागी होणार नाही, त्यांचा एकही आमदार मंत्री होणार नाही, असा निर्णय घेतला आहे. शपथविधी समारंभात इंडिया आघाडीमधील अनेक नेते उपस्थित होते, मात्र केजरीवाल आणि ममता बॅनर्जी या कार्यक्रमाला उपस्थित राहिले नाहीत.

## केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्ता वाढीला कॅबिनेटची मंजुरी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्र सरकारने लाखो कर्मचारी आणि पेन्शनर्स यांच्यासाठी मोठा निर्णय घेतला आहे. दिवाळीपूर्वीच केंद्र सरकारच्या सेवेतील कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या कॅबिनेटची बैठक बुधवारी (दि.१६) झाली.



(संग्रहित छायाचित्र)

या बैठकीत डीए आणि डीआरमध्ये तीन टक्के वाढ करण्यास मंजुरी दिली आहे. महागाई भत्ता वाढवण्यात आला असून तो १ जुलै २०२४ पासून लागू असेल. यामुळे लाखो कर्मचारी आणि पेन्शनर्सला लाभ होणार आहे. केंद्राच्या सेवेत ४९ लाख कर्मचारी आहेत तर, ६० लाख निवृत्तीवेतनधारक आहेत.

केंद्र सरकारच्या सेवेतील कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता दिला जातो. तर, निवृत्तीवेतनधारकांना महागाई दिलासा भत्ता जातो. सर्वसाधारणपणे डीए आणि डीआर वर्षातून दोन वेळा वाढवला जातो. केंद्र सरकारने जुलैमध्ये निर्णय घेणे अपेक्षित असताना निर्णय न झाल्याने विविध कर्मचारी संघटनांनी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांना पत्र लिहिले होते. आता केंद्राच्या कर्मचाऱ्यांना तीन महिन्यांचा फरक मिळेल.

कर्मचाऱ्यांना ऑक्टोबर महिन्याचा पगार वाढवून मिळेल, त्याशिवाय निवृत्तीवेतनधारकांच्या पेन्शनमध्येदेखील वाढ होईल. याशिवाय जुलै ते सप्टेंबर या तीन महिन्यांचा फरकदेखील मिळणार आहे.

### दरवर्षी दोनदा वाढ

केंद्र सरकारकडून केंद्राच्या कर्मचाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या महागाई भत्त्यामध्ये दोनदा वाढ करण्यात येते. याकडे कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले होते. केंद्र सरकारने महागाई भत्ता वाढवल्यानंतर राज्य सरकारांकडूनदेखील त्यांच्या सेवेतील कर्मचाऱ्यांच्या भत्त्यात वाढ केली जाते. केंद्राच्या निर्णयानंतर इतर कोणती राज्य असा निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## कामोठे येथे रस्त्याच्या काँक्रीटीकरण कामाचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक कार्यकर्ते प्रदीप भगत यांच्या पाठपुराव्याने कामोठे येथे रस्त्याच्या काँक्रीटीकरण कामाचा शुभारंभ आचारसंहिता लागू होण्यापूर्वी मंगळवारी (दि. १६) करण्यात आला.

कामोठे येथील सेक्टर २२ हावरे प्लॉट नं. १५मध्ये फेज १/२/३ समोरील रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते प्रदीप भगत यांनी एमएमआरडीकडे पाठपुरावा केला होता. त्यानुसार एमएमआरडीच्या निधीतून या कामाला सुरुवात करण्यात आली. या कामाचे भूमिपूजन आचारसंहिता लागू होण्यापूर्वी करण्यात आले. या कामाचा अंदाजित खर्च १८,६४,०६० रुपये आहे.

या कार्यक्रमाला सामाजिक कार्यकर्ते प्रदीप भगत, अनंत वायकर, सचिन यमगर, उदय रतन साळवी, अनंत पांडुरंग वायकर, मंगेश केशव गायकवाड, शिवाजी गणपती जाधव, श्रेयस संजय वायदंडे, मनीषा संजय वायदंडे, वैष्णवी विशाल चेंबूरकर, मेघाली मंगेश गायकवाड, प्रकाश राठोड, मंगेश म्हात्रे, सागर सुरवासे, मंजुनाथ सोनार, सुनील लिंगायत, अपर्णा करवंदे, योगिता म्हात्रे, वर्षा जोशी, स्मिता मगर, निलम उभारे, विमल रॉड्रिक्स, रूपाली देवकुते, रेखा माने आदी उपस्थित होते.





## मुख्यमंत्री माझी शाळा अभियानात वडगाव शाळा रायगड जिल्ह्यात प्रथम

**चौक : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी शाळा अभियानांतर्गत खालापूर तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेच्या वडगाव येथील उच्च प्राथमिक शाळेने रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांक येण्याचा तर मुंबई विभागात द्वितीय क्रमांक पटकावला आहे. मुख्याध्यापक सुभाष राठोड आणि शिक्षक यांचे अभिनंदन होत आहे.



मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा उपक्रमात खालापूर तालुक्यातील वडगाव शाळेने विविध उपक्रम राबविले. यात प्रत्येक मुल आनंददायी, पिण्याचे स्वच्छ पाणी, सर्व वर्गात विद्युत पुरवठा, पंखे, डिजिटल रूम, पट संख्या वाढविणे, इंग्रजी माध्यमांत शिकणारी मुले पुन्हा वडगाव शाळेत, गैरहजर त्याची दारी शाळा, सर्व शाळा रंगीत, ओला कचरा, सुका कचरा यांचे वर्गवारी आणि कंपोस्ट खत निर्मिती, गांडूळ खताची निर्मिती, पाणी अडवा पाणी जिरवा, झाडे लागवड आणि संगोपन, मतदान जनजागृती, संगणक लॅब, शासनाचे उपक्रम राबविणे, स्वागत कमानी, असे अनेक उपक्रम राबविले आहेत. मुख्याध्यापक सुभाष राठोड,सर्व शिक्षक, शाळा समिती, ग्रामस्थ, विवीध माध्यमे, जिल्हा शिक्षण अधिकारी, गटविकास अधिकारी संदीप कराड, गट शिक्षण अधिकारी चोरमोळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

मुंबई मंत्रालय येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शिक्षण मंत्री दीपक केसरकर, शिक्षण सचिव कुंदन मॅडम, शिक्षण आयुक्त सुरज मांढरे व मान्यवरांच्या उपस्थित सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व धनादेश देऊन गौरविण्यात आले. या वेळी शिक्षणाधिकारी पुनीता गुरव, शिक्षणाधिकारी तुपे, गटशिक्षण अधिकारी कैलास चोरामले, शिक्षण विस्तार अधिकारी शिल्पा दास, सरपंच गौरी गडगे, महादेव गडगे, शिक्षण समिती अध्यक्ष करूणा ठोंबरे आदी मान्यवर मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमास उपस्थित होते.

माझे स्वप्न शाळा आंतरराष्ट्रीय करणे व सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण सहज व सुलभ उपलब्ध होईल असे काम सर्वांच्या सहकार्याने करायचे आहे, असे मुख्याध्यापक सुभाष राठोड यांनी सांगितले.

## निवडणूक आयोगाचे नियम पाळून प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची घोषणा केली असून जिल्ह्यात आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. जिल्ह्यातील सर्व राजकीय पक्षांनी निवडणूक नियमांचे काटेकोरपणे पालन करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.



जिल्हाधिकारी कार्यालयात विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधीसमवेत आयोजित बैठकीत जावळे बोलत होते. या वेळी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) नितीन वाघमारे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी जावळे म्हणाले, निवडणुकीच्या कालावधीमध्ये विविध राजकीय पक्षांकडून सभा तसेच बैठकांचे आयोजन करण्यात येते. या सर्व सभा व बैठकांची माहिती प्रशासनास देऊन त्यासाठी आवश्यक त्या परवानग्या प्राप्त करून घ्याव्यात. मतदारांना कुठल्याही प्रकारचे प्रलोभन दाखविले जाणार नाही, याची दक्षता घ्यावी. विविध जाती, धर्म, भाषिक संप्रदायांमध्ये तेढ निर्माण होईल, असे कुठलेही वक्तव्य करू नये. कुठल्याही धार्मिक स्थळाचा प्रचारासाठी वापर करू नये. समाजमाध्यमांवर पोस्ट करतेवेळी आवश्यक ती काळजी घ्यावी, असेही जावळे यांनी स्पष्ट केले.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज आहे. यासाठी आवश्यक त्या सर्व प्रतिबंधात्मक कारवाया करण्यात येत आहे. या निवडणुकीत पोलिसांची सोशल मीडियावरदेखील करडी नजर असणार आहे. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्वाचे सर्वांनी पालन करावे, असे आवाहन घार्गे यांनी या वेळी केले.

# परशुराम घाटात मातीचा भराव गेला वाहून

## महामार्गावर एकेरी वाहतूक सुरू



**चिपळूण : प्रतिनिधी**

गेली कित्येक वर्षे रखडलेल्या मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाने परतीच्या पावसातही दगा दिला. महामार्ग तयार करण्यासाठी पेढे नजीक केलेला मातीचा भराव मंगळवारी रात्री झालेल्या परतीच्या पावसात वाहून गेला. त्यामुळे रस्त्यालाही धोका निर्माण झाला आहे. सध्या महामार्गावर एकेरी वाहतूक सुरू आहे. वाहनचालक सध्या जीव मुठीत धरून प्रवास करीत आहेत.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरल परशुराम घाट ते कशेडी घाट पायथा या दरम्यानच्या ४४ किमी रस्त्याचे काम कल्याण टोलवेज इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीकडे आहे. अन्य तालुक्यांमध्ये काम करणाऱ्या ठेकेदार कंपन्यांच्या तुलनेत या कंपनीने महामार्ग चौपदरीकरणाचे काम जलद गतीने पूर्ण केले आहे. परशुराम घाटात रस्ता बनविण्यासाठी डोंगर कटाई करण्यात आली. यावर्षी पावसाळ्यात सुरवातीलाच दरडी कोसळल्या. काही ठिकाणी मातीचा भराव टाकून रस्ता बनविण्यात आला आहे. त्याच्या बाजूला संरक्षण भिंती बांधण्यात आल्या आहेत.

गुरुवारी पहाटे परतीच्या पावसात मातीचा भराव आणि रस्त्याच्या कडेला बांधलेली संरक्षक भिंत वाहून गेली. रस्त्याच्या खालील मातीचा भरावही वाहून गेला आहे. ज्या ठिकाणी ही घटना घडली तिथपासून काही अंतरावर पेढे गावची लोकवस्ती आहे.

सुदैवाने हा भराव लोकवस्तीमध्ये गेला नाही. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. रस्ता सिमेंट काँक्रीटचा असल्यामुळे तो तुटला नाही. पहाटेच्या दरम्यान घडलेली ही घटना वाहन चालकांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी त्या ठिकाणाहून वाहने नेण्याचे टाळले.

सकाळी या घटनेची माहिती राष्ट्रीय महामार्ग विभागाला मिळाल्यानंतर महाड येथील उपअभियंता अमोल माडकर आणि त्यांचे सहकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी तत्काळ हा रस्ता बंद करून उजव्या बाजूने एकेरी वाहतूक सुरू केली.

# ...तर समाजवादी पार्टी स्वबळावर निवडणूक लढवणार

## अबू आझमींचा महाविकास आघाडीला इशारा

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. सध्या महायुती आणि महाविकास आघाडीकडून जागावाटपाबाबत चर्चा सुरू आहे. अशातच समाजवादी पार्टीचे नेते अबू आझमी यांनी आणि महाविकास आघाडीतील घटक पक्ष आणि त्यांच्या नेत्यांना म्हणजे काँग्रेस, उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना इशारा दिला आहे. समाजवादी पार्टीसोबत चर्चा केल्याशिवाय उमेदवारांची यादी जाहीर करू नये. तसे झाल्यास समाजवादी पार्टी महाविकास आघाडीतून बाहेर पडेल, असे अबू आझमी यांनी म्हटले आहे.

महाविकास आघाडीतील नेत्यांनी आपल्या आघाडीत समाजवादी पार्टीचा अपमान करू नये. आत्तापर्यंत महाविकास आघाडीच्या अनेक बैठका झाल्या, मात्र समाजवादी पार्टीला फक्त एकाच बैठकीत बोलावण्यात आले आणि केवळ ५ मिनिटे चर्चा झाली. समाजवादी पार्टी हा देशातील तिसऱ्या क्रमांकाचा पक्ष आहे, त्याला हलक्यात घेऊ नये, असे अबू आझमी म्हणाले, तसेच जर समाजवादी पार्टीला विश्वासात घेतले नाही आणि योग्य वाटा दिला नाही तर समाजवादी पार्टीला इतर कोणत्याही आघाडीसोबत म्हणजेच तिसरी आघाडी किंवा प्रकाश आंबेडकर किंवा महाराष्ट्रात अनेक जागांवर स्वबळावर निवडणूक लढवेल, असे अबू आझमी यांनी सांगितले.

महाराष्ट्रात समाजवादी पार्टीने महाविकास आघाडीकडे १२ जागांची मागणी केली असून पाच जागांसाठी तयारी पूर्ण केली आहे. मानखुर्द शिवाजीनगर गोवंडी, भिवंडी पूर्व, भिवंडी पश्चिम, मालेगाव आणि धुळे या जागांसाठी समाजवादी पार्टीने तयारी केली असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय, मुंबईतील अणुशक्ती नगर, वर्सोवा, औरंगाबाद पूर्व, बाळापूर, भायखळा अशा एकूण १२ जागांची मागणी समाजवादी पार्टीने केली आहे.

# 'मविआ'मध्ये काँग्रेसच्या वाट्याला ८४ जागा -नाना पटोले

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी राजधानी दिल्लीत काँग्रेसच्या छाननी समितीची बैठक पार पडली. महाविकास आघाडीमध्ये २८८ जागांपैकी २२२ जागांचा तिढा सुटला असून यापैकी ८४ जागा काँग्रेसच्या वाट्याला आल्याची माहिती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली.

छाननी समितीच्या बैठकीसाठी महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, सतेज पाटील, नाना गावंडे ही नेते मंडळी दिल्लीत दाखल झाली. दरम्यान, नाना पटोले म्हणाले की, २० तारखेला केंद्रीय निवडणूक समितीची बैठक आहे. या बैठकीनंतर पहिली यादी येणे अपेक्षित आहे. महाविकास आघाडीमध्ये कोण मोठा भाऊ, कोण लहान भाऊ याचा आम्ही विचार करीत नाही, मेरीटवर आम्ही पुढे जात आहोत.

महाराष्ट्रासाठी ज्येष्ठ नेते मधुसूदन मिस्त्री यांच्या अध्यक्षतेखाली छाननी समिती काम करीत आहे. यामध्ये सप्तगिरी संकर उलका, मन्सूर अली खान, डॉ. श्रीवेल्ला प्रसाद हे नेतेही सदस्य आहेत, तसेच या समितीमध्ये अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने नियुक्त केलेल्या पदाधिकाऱ्यांसह प्रदेश काँग्रेसचे प्रभारी, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष, विधिमंडळ पक्षनेते हे पदसिद्ध सदस्य आहेत. राज्यासाठी तयार केलेल्या छाननी समितीमध्ये मुंबई विभागीय काँग्रेस अध्यक्ष आणि महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेते हेही पदसिद्ध सदस्य आहेत.

# राज धुमाळ याची आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणासाठी निवड

**खारघर : प्रतिनिधी**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील राष्ट्रीय स्वयंसेवकाची संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथे ७ ते १७ नोव्हेंबर या दरम्यान होणाऱ्या राज्य स्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरासाठी निवड झाली आहे.



राष्ट्रीय सेवा योजना विभागातील राज धुमाळ हा व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरासाठी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथे जाणार आहे, तसेच त्यासाठी महाराष्ट्रातून वेगवेगळ्या विद्यापीठातून राष्ट्रीय सेवा योजना विभागातील इतर विद्यार्थी व विद्यार्थिनीही सहभाग घेणार असून आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण घेणार आहेत.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी राज धुमाळचे आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरासाठी निवड झाल्याबद्दल त्याचे अभिनंदन केले व प्रशिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रमाधिकारी प्रा. प्रथमेश ठाकूर तसेच प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. शितल चव्हाण, प्रा. नीलम मोरे, प्रा. शुभम शर्मा, प्रा. राहुल कांबळे, प्रा. मनोज यादव तसेच इतर सर्व प्राध्यापकांचे त्याला मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

# अल्पवयीन मुलावर सामुहिक लैंगिक अत्याचार

**अहिल्यादेवी नगर : प्रतिनिधी**

राज्यात बाल लैंगिक अत्याचार आणि अल्पवयीन व महिलांवरील अत्याचाराच्या घटना सातत्याने समोर येत आहेत. बदलापूरच्या शाळेतील बाल लैंगिक अत्याचाराची घटना समोर आल्यानंतर राज्यभर संतापाची लाट उसळली होती. अहिल्यादेवी नगर जिल्ह्यात ११ वर्षीय अल्पवयीन मुलावर लैंगिक अत्याचाराची घटना घडल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी श्रीरामपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.



जिल्ह्यातील श्रीरामपूर शहरात ११ वर्षीय अल्पवयीन मुलावर अनैसर्गिक अत्याचार झाल्याची घटना घडली आहे. येथील नऊ जणांनी मिळून या अल्पवयीन मुलासोबत हे कृत्य केले असून अत्याचार करणारे देखील अल्पवयीन असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या अत्याचारप्रकरणी पीडित मुलाच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून श्रीरामपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींना ताब्यात घेण्यात आल्याची माहिती पोलीस निरीक्षकांनी दिली.

११ वर्षीय अल्पवयीन मुलास धमकावून हा अनैसर्गिक अत्याचार करण्यात आला असून पोलिसांकडून प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे, मात्र या घटनेने पुन्हा एकदा बाललैंगिक अत्याचाराच्या घटनांची गांभीर्यता समोर आली आहे.

# दस्तुरी नाका परिसर चकाचक; माथेरान पालिकेकडून विशेष स्वच्छता मोहीम

**कर्जत : प्रतिनिधी**

माथेरान या पर्यटनस्थळाची सर्व व्यवस्था नगर परिषदेकडून केली जाते, मात्र या पर्यटनस्थळी येण्यासाठी असलेले एकमेव प्रवेशद्वार हे अस्वच्छतेचे गर्तेत सापडले होते. त्यामुळे माथेरान पालिकेने दस्तुरी नाका हा परिसर विशेष स्वच्छता मोहीम राबवून स्वच्छ केला.

थंड हवेचे ठिकाण आणि मुंबईपासून सर्वांत जवळ असल्याने वर्षाकाठी १० लाखांहून अधिक पर्यटक माथेरानमध्ये येत असतात. शहरात येण्यासाठी सध्या दस्तुरी नाका एकमेव ठिकाण असून प्रवासी टॅक्सी आणि खासगी वाहने घेऊन आल्यावर दस्तुरी येथे उतरून पुढे माथेरान शहरात जावे लागते. त्या दस्तुरी नाका परिसराला माथेरान पालिकेच्या



दुर्लक्षपणामुळे अस्वच्छतेचे स्वरूप प्राप्त झाले होते. त्यात अनेक महिने पडून राहिलेला कचरा हादेखील गंभीर प्रश्न निर्माण झाला होता.

पालिकेच्या स्वच्छता पथकाने ही मोहीम राबविताना सर्व स्वच्छता कर्मचारी यांच्या साहाय्याने दस्तुरी नाका परिसरातील रुग्णवाहिका मार्ग, वाहनतळ तसेच एमटीडीसी परिसरातील रस्त्यांच्या आजूबाजूला साठून राहिलेला कचरा यांची विल्हेवाट लावली. त्यात प्रामुख्याने वाहनतळ भागात मोठ्या प्रमाणात मालवाहतूक करणारे साहित्य पडून राहिले असल्याने या परिसराला बकाल रूप आले होते. त्यामुळे शेवटी पालिकेने मनावर घेऊन दस्तुरी परिसर स्वच्छ करण्याची मोहीम यशस्वी केली.

पालिकेचे स्वच्छता निरीक्षक नरेंद्र सावंत यांनी त्या ठिकाणी स्वच्छता करण्यासाठी नेमणूक असलेले तीन कर्मचारी काय काम करतात, यासाठी पालिकेने बसवलेल्या सीसीटिव्ही कॅमेरे यांचा आधार घेतला जाईल, अशी माहिती या स्वच्छता मोहिमेनंतर दिली.

# राज्यस्तरीय वादविवाद व वक्तृत्व स्पर्धेत पनवेल महाविद्यालयाचे घवघवीत यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

येथील रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्यायश रवींद्र पाटील व पंकज पंढरीनाथ पांडुळे या मुलांच्या संघाने अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज अहमदनगर यांनी आयोजित केलेल्या कॉ. एकनाथराव भागवत स्मृती करंडक वादविवाद स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळविले. याच स्पर्धेत वक्तृत्व प्रकारातयश रवींद्र पाटील याने तृतीय क्रमांकाचे बक्षीस मिळविले.





या दोघांच्या संघाने हिंद सेवा मंडळाचे, पेमराज सारडा महाविद्यालय अहमदनगर यांनी आयोजित केलेल्या शारदा करंडक राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस जिंकत साडेतीन किलो वजनाचाचांदीचा फिरता करंडक महाविद्यालयास मिळवून दिला.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल प्रतिक्रिया देताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी असे प्रतिपादन केले की, महाविद्यालयाचा सांस्कृतिक विभाग दरवर्षीप्रमाणे याही वर्षी चमकदार कामगिरी करीत आहे. मुंबई विद्यापीठाच्या युवा महोत्सवात या विभागाने आपली दमदार छाप उमटवली आहे. आजराज्यस्तरीय वादविवाद व वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांनी जे घवघवीत यश संपादन केले त्याबद्दल त्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले. या आनंदाच्या प्रसंगी त्यांनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यास्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या सांस्कृतिक कमिटीचे चेअरमन प्रा. प्रवीण गायकर, डॉ. लीना मेश्राम, डॉ. कीर्ती म्हात्रे, डॉ. प्रफुल्ल वशेणीकर व सांस्कृतिक कमिटीतील सर्व सदस्यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल समाजाच्या विविध स्तरांतून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

पान १ वरुन

## न्यायदेवतेच्या डोळ्यावरील काळी पट्टी हटवून हाती संविधान

सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्या मते आता आपल्याला ब्रिटिशांच्या परंपरा आणि वारशाच्या पुढे गेले पाहिजे. कायदा कधीच अंध असू शकत नाही. तो सर्वांना समान पद्धतीने पाहतो. यामुळेच सरन्यायाधीश न्यायदेवतेच्या मूर्तीत बदल केला जाण्याची गरज असल्याचे म्हटले होते. त्याच बरोबर देवीच्या एका हातात तलवारच्या जागी संविधान पाहिजे. ज्यामुळे समाजात संदेश जाईल की देवी संविधानानुसार न्याय करते.

सरन्यायाधीशांच्या मते तलवार हिंसेचे प्रतीक आहे. न्यायालयात हिंसा नाही तर संविधानाच्या कायद्यानुसार न्याय होतो. दुसऱ्या हातात असलेला तराजू योग्य आहे जो सर्वांना समान पद्धतीने न्याय देते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी दिलेल्या आदेशानंतर न्यायदेवतेची नवी मूर्ती तयार करण्यात आली. अशी पहिली मूर्ती न्यायधीशांच्या ग्रंथालयाबाहेर लावण्यात आली. ज्या मूर्तीच्या डोळ्यावर पट्टी नाही आणि हातात तलवार ऐवजी संविधान आहे.

न्यायदेवतेची मूळ मूर्ती यूनानमधील प्राचीन देवी असल्याचे सांगितले जाते. तिला न्यायाचे प्रतीक म्हटले जाते. या देवीचे नाव जस्टिया असून त्यातूनच जस्टिस हा शब्द तयार झाला. या देवीच्या डोळ्यावर कायम पट्टी असायची, याचा अर्थ न्यायदेवी नेहमी निष्पक्ष राहून न्याय करेल. कोणाला पाहून न्याय करताना निर्णय एकाच्या बाजूने दिला जाऊ शकतो यासाठी ही पट्टी बांधण्यात आली होती.

# कार्तिकी यात्रा नियोजनासाठी प्रशासनाची बैठक


## स्वच्छतेला प्राधान्य; गर्दीचे करणार योग्य व्यवस्थापन

**पंढरपूर : प्रतिनिधी**

कार्तिकी यात्रा कालावधीत चंद्रभागा नदीच्या पैलतीरावरील ६५ एकर जागेत भाविकांना अधिकच्या सुविधा देण्यात येणार आहे. गर्दीचे सूक्ष्म व स्वच्छतेचे नियोजन करावे, तसेच यात्रेत येणाऱ्या भाविकांची कोणतेही गैरसोय होणार नाही याची दक्षता सर्व संबधित विभागाने घ्यावी अशा, सूचना प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिल्या.

कार्तिकी यात्रा कालावधीत भाविकांच्या सोयीसुविधांसाठी प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या नियोजनाबाबत प्रांत कार्यालय, पंढरपूर येथे बैठक घेण्यात आली. या बैठकीस उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशील संसारे, कार्यकारी अभियंता अमित निंबकर, पोलीस निरीक्षक विश्वजित घोडके, मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

या वेळी बोलताना प्रांताधिकारी इथापे म्हणाले, यात्रा कालावधीत भाविकांच्या सुविधेबाबत नगर पालिका व मंदिर प्रशासनाची महत्त्वाची जबाबदारी आहे. या



कालावधीत नगरपालिकेने स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा मुबलक पाणीपुरवठा करावा, वाळवंटातील तसेच शहरातील अतिक्रमणे तत्काळ काढावीत.

पुरेसा प्रकाश राहील याबाबत नियोजन करावे, धोकादायक इमारतींवर ठळक सूचना फलक लावावेत. एसटी महामंडळाने प्रवाशी वाहतुकीचे नियोजन करून बसस्थानकावर आवश्यक सुविधा उपलब्ध कराव्यात, अशा सूचनाही प्रांताधिकारी इथापे यांनी दिल्या.

या वेळी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.भोसले म्हणाले, यात्रा कालावधीत वाहतूक व्यवस्था सुरळीत राहावी तसेच भाविकांना सुरक्षेबाबत कोणतीही अडचण येऊ नये यासाठी पोलीस प्रशासनाने आवश्यक नियोजन केले आहे.

नगरपालिकेने शहरातील पार्कींग ठिकाणची लेव्हलिंग करून झाडेझुडपे काढावीत तसेच प्रकाश व्यवस्था करावी. मंदिर व मंदिर परिसरात फिरत्या विक्रेत्यांमुळे मोठ्या प्रमाणात भाविकांना त्रास होतो. यासाठी जादा हॉकर्स पथकाची नेमणूक करावी अशा सूचना त्यांनी या वेळी दिल्या.

# निवडणूक प्रक्रियेपर्यंत आंदोलन, मोर्चा, उपोषण करण्यावर निर्बंध

**रायगड : रामप्रहर वृत्त**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणुकिची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत संपूर्ण रायगड जिल्ह्यात सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय, संस्था, शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्याच्या ठिकाणी धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निर्बंध घालण्यात आले असल्याचे आदेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी बुधवारी (दि.१६) जारी केले.

भारत निवडणूक आयोगाने १५ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या प्रसिद्धी पत्रकान्वये महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ चा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आली आहे. रायगड जिल्ह्यातील सात विधानसभा मतदार संघातील निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून जिल्हादंडाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी, तालुका दंडाधिकारी कार्यालय तसेच जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय, शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्यावर कोणत्याही राजकीय पक्षाने, व्यक्तीने, संघटनेने, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा त्याच्या हितचिंतकाने धरणे, आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निबंध घालणे आवश्यक होते. असल्याची माझी खात्री झाली आहे, तसेच सर्व संबंधितांना नोटीस देऊन त्यांचे म्हणणे ऐकून घेणे सद्यस्थितीत शक्य नसल्याने जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी एकतर्फी आदेश काढणे आवश्यक असल्याची खात्री करून घेतली आहे.

जिल्हादंडाधिकारी रायगड यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३चे कलम १६३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून निर्बंध आदेश जारी केले आहेत.

## निवडक

### मद्याच्या बाटल्यांनी भरलेला टेम्पो पलटी



**पनवेल :** मद्याच्या बाटल्यांनी भरलेला आयशर कंपनीचा टेम्पो खारघर येथे पलटी झाला. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. जीएम बाटल्यांचे बॉक्स भरून (एमएच १२ व्हीएफ ८१४९) हा टेम्पो वसई ते पुणे येथे जात होता. सायन-पनवेल हायवेच्या दिशेने जात असताना मंगळवारी (दि.१५) मध्यरात्री १.३०वा.च्या सुमारास खारघर पोलीस स्टेशनच्या समोर या टेम्पोचे चाक फुटले आणि टेम्पो विरूद्ध दिशेला पलटी होऊन अपघात झाला. यात टेम्पोचे मोठे नुकसान झाले आहे, तर जीएमच्या अनेक बाटल्यादेखील फुटल्या असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

### पेठ गावातून तरुणी बेपत्ता



**पनवेल :** राहत्या घरातून एका तरुणीस कायदेशीर रखवालीतून फूस लावून पळवून नेल्याची घटना तालुक्यातील पेठ गाव येथे घडली आहे. काजल राजेंद्र पासवान असे या तरुणीचे नाव असून रंग सावळा, चेहरा गोल, बांधा मध्यम, केस काळे लांब, नाक सरळ असून लाल पंजाबी ड्रेस, पायात काळ्या रंगाची चप्पल आहे. तिला हिंदी भाषा अवगत आहे. या तरुणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी (२७४५२३३३) किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वप्नील केदार (९७६६४५४२४५) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### बाऊन्सरकडून महिलांना मारहाण

**नवीन पनवेल :** महिला बाउन्सरकडून दोन महिलांना मारहाण केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात चौघांविरोधात तक्रार दाखल करण्यात आली. सरिता वामन गायकर या भिंगारवाडी, पनवेल येथे राहत असून निलेश बाबरे हे अरोरा यांच्या कंपनीचे काम करतात. सरिता गायकर आणि निलेश बाबरे यांच्या एकमेकांविरूद्ध जमिनीच्या वादातून तक्रारी दाखल आहेत. निलेश बाबरे हे मंगळवारी (दि.१५)सोबत इतर महिला बाउन्सर यांना घेऊन पत्रा काढण्याचे काम करत असताना सरिता गायकर व त्यांच्यासोबत त्यांची जाऊबाई रंजना यांनी हा पत्रा काढू नका, ही जागा आमची आहे असे बोलले असता सरिता गायकर यांना निलेश बाबरे यांनी दमदाटी केली. इतर तीन महिला बाउन्सर यांनी दोघींना हाताचापटिने मारहाण केली. याप्रकरणी निलेश बाबरे आणि इतर तीन बाउन्सर महिलाांविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

# उरणकरांवर आता सीसीटीव्हीची नजर

### ३४ ठिकाणी १०० सीसीटीव्ही कॅमेरे बसविणार



**उरण : रामप्रहर वृत्त**

गेल्या अनेक महिन्यांपासून उरण शहरातील सीसीटीव्ही बंद असून येत्या काही दिवसांतच उरणकरांच्या सुरक्षेसाठी महत्वाच्या ३४ ठिकाणी १०० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. त्यामुळे पोलीस यंत्रणेला याचा फायदा होणार आहे. यासाठी उरण नगर परिषदेच्या माध्यमातून ही व्यवस्था करण्यात येणार आहे.

जुलै महिनाभरात उरण-पनवेल या रहदारीच्या मार्गावर झालेल्या हत्याकांडानंतर उरणकरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला होता, तर मागील अनेक महिन्यांपासून शहर आणि परिसरातील सीसीटीव्ही बंद असल्याचे समोर आल्याने उरणमधील महिला आणि रहिवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला होता.

मुंबई आणि उरण तालुक्याला जोडणाऱ्या अटल सेतू आणि रेल्वे सेवेमुळे हे अंतर अवघ्या ३० ते ४० मिनिटांवर आले आहे. त्यातच उरण तालुक्यातील वाढते व्यवसाय, कंटेनर यार्ड्स आणि बंदर यामुळे हजारो रहिवासी हे दररोज ये-जा करीत आहेत. यामुळे, उरण परिसरातील बदलती रहिवाशी संख्या वाढली असून गेल्या काही महिन्यांपासून गुन्हेगारीमध्येदेखील वाढ झाली आहे. बाजारात होणारी गर्दी, शाळा, महाविद्यालय परिसर आदी ठिकाणी घडणाऱ्या घटनांवर नजर ठेवण्यासाठी या सीसीटीव्हीचा उपयोग होणार आहे.

शहरातील बाजारपेठ ही तालुक्यातील व्यावसायिक आणि रहिवाशांसाठी मुख्य बाजारपेठ असल्याने दररोज हजारो रहिवासी हे बाजारहाटासाठी येत असतात. त्यातच शहरातील मुख्य बाजारपेठ असलेल्या रस्त्यांवरील सीसीटीव्ही बंद होते.

वर्षभरापूर्वी उरण शहर आणि परिसरात सुमारे ८५ सीसीटीव्ही लावण्याचा प्रस्ताव पोलिसांकडून देण्यात आला होता, मात्र आता उरण नगर परिषदेने ही जबाबदारी स्वीकारली असून लवकरच १०० सीसीटीव्ही कार्यान्वित होणार आहेत.

> **उरण शहरातील बंद सीसीटीव्ही सुरू करून शहरातील हालचालींवर नियंत्रण ठेवण्यासाठी कक्ष उभारण्यात येणार असून यासाठी नगर परिषदेकडून अंमलबजावणी करण्यात येणार असून त्याची कार्यवाही सुरू आहे.**
> **-जितेंद्र मिसाळ, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,उरण पोलीस ठाणे**

> **उरणच्या शहरातील मोक्याच्या ३४ ठिकाणी १०० सीसीटीव्ही उरण नगर परिषदेच्या वतीने बसविण्यात येणार आहेत. या कामाची सुरुवात झाली आहे.**
> **-समीर जाधव, मुख्याधिकारी, उरण नगर परिषद**

## पनवेल पोलीस घेतायेत १८९ गाड्यांच्या मालकाचा शोध

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घडलेल्या अपघाती, गुन्ह्यातील, बेवारस अशा १८९ वाहनांच्या मूळ मालकाचा शोध घेत असून या संदर्भात त्यांनी पनवेल शहर पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहनसुद्धा करण्यात येत आहे.

त्यामध्ये प्रामुख्याने दुचाकी १२३ वाहने, चारचाकी ५१ वाहने, थ्रिव्हीलर १४, अवजड वाहने ०१ अशी एकूण १८९ वाहने अनेक वर्षांपासून पडून आहेत. त्यामुळे आरोग्याचा धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून बेवारस वाहने ज्या मालकांची आहेत त्यांनी आपल्या वाहनांची कागदपत्रे दाखवून सात दिवसाच्या आत घेऊन जावेत अन्यथा पोलिसांकडून त्या वाहनाबाबतची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल, असे आवाहन पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे यांनी केले आहे.

या संदर्भात संबंधित वाहन मालकांशी पत्रव्यवहार करण्यास सुरुवात केली आहे, तरी वाहनमालकांनी सहकार्य करावे, असे आवाहनसुद्धा केले आहे.

## आमदारकी म्हणजे संघटनेने व्यक्त केलेला विश्वासच -आमदार विक्रांत पाटील

**कळंबोली : बातमीदार**

विद्यार्थी परिषदेमध्ये असताना संघ संस्काराने परिपूर्ण झालो. पक्षाने दिलेली सर्व जबाबदारी चोखपणे पार पडून पक्षाची ध्येय धोरणे तळागाळापर्यंत रुजवण्यात यशस्वी झालो. मी निष्ठेने केलेल्या माझ्या कामाचे मूल्यमापन वरिष्ठ पातळीवर करून मला विधान परिषदेवर आमदार म्हणून राज्यपाल नियुक्त केले हा पक्ष आणि संघटनेने व्यक्त केलेला माझ्यावरचा विश्वासच असल्याचे मनोगत नवनियुक्त आमदार विक्रांत पाटील यांनी पनवेल येथे व्यक्त केले.




राज्यपाल नियुक्त करण्यात आलेले भाजपचे महासचिव आमदार विक्रांत बाळासाहेब पाटील यांची पनवेल तालुका पत्रकार विकासमंचच्या पदाधिकाऱ्यांनी भेट घेऊन पुढील अभिनंदन केले. या वेळी अध्यक्ष विवेक पाटील, सचिव मंदार दोंदे, ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील, दीपक घोसाळकर, संजय कदम, राजेंद्र पाटील, राजीव गाडे, प्रवीण मोहकर उपस्थित होते. आमदार विक्रांत पाटील यांनी, राज्यस्तरीय तसेच केंद्रीय स्तरावरच्या पक्षाच्या विविध समित्यांमधून काम करण्याची संधी मला प्राप्त झाली. पक्षाचे काम करीत असताना पक्षाकडून काही मिळेल याची कोणतीही अपेक्षा न ठेवता काम करीत असताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस साहेबांसोबत काम करण्याची मोठी संधी मला मिळाली. अनेक वर्ष केलेल्या कामाचे परिश्रमाचे पक्षाने मूल्यमापन केले अन मला विधान परिषदेवर आमदार म्हणून नियुक्त केले, हे मी केलेल्या पक्षाच्या कामाची एक पोचपावतीच असल्याची भावना व्यक्त केली. मला अजून भरपूर पक्षाचे काम हे राज्यभर फिरून तितक्याच तडफेने करायचे असल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.



**पनवेल : मागील १३ वर्षे राजे शिवराय प्रतिष्ठान पनवेलमध्ये दिवाळीत मोठ्या उत्साहात दुर्गदर्शन सोहळा आयोजित करीत आले आहे. या वर्षी श्री पुरंदर गडाची भव्य प्रतिकृती साकारणार आहे. कोजागरी पौर्णिमेला बुधवारी या दुर्गदर्शन सोहळ्याचे भूमिपूजन करण्यात आले. गुरुवारपासून किल्ला बांधण्यासाठी सुरुवात करण्यात आली. या सोहळ्याचे उद्‌घाटन २७ ऑक्टोबर रोजी होणार आहे.**

## बीसीटी महाविद्यालयात डीएलएलईसाठी ओरिएंटेशन कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदा कॉलनी येथील भागूबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांना दैनंदिन प्रकल्पांचे महत्त्व आणि विभागासाठी नावनोंदणी प्रक्रियेची ओळख करून देण्याच्या उद्देशाने मंगळवारी (दि.१५) आजीवन शिक्षण विस्तार विभागासाठी (डीएलएलई) प्रबोधनात्मक ओरिएंटेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रभारी प्राचार्या सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली डीएलएलई समिती प्रभारी संग्राम पवार यांनी आयोजिन केले.



या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डीएलएलईचे क्षेत्र समन्वयक डॉ. बी. एस. पाटील, सहाय्यक प्राध्यापक हरिभाऊ खरात उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले आणि शैक्षणिक विकास वाढविण्यासाठी दैनंदिन प्रकल्पांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर भर दिला.

बी. एस. पाटील आणि प्राध्यापक खरात यांनी प्रकल्पाच्या कामात सातत्य ठेवल्याने संशोधन कौशल्याला चालना तर मिळतेच, शिवाय क्रिटिकल थिंकिंग आणि प्रभावी वेळेचे व्यवस्थापन ही वाढते, यावर प्रकाश टाकला. हे प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण केल्यास विद्यार्थ्यांच्या एकूण शैक्षणिक कामगिरीत हातभार लागेल आणि शैक्षणिक वर्षाच्या अखेरीस गुणवाटप होईल, यावर त्यांनी भर दिला.

प्राध्यापक खरात यांनी विद्यार्थ्यांनी हाती घेणे अपेक्षित असलेल्या विविध प्रकल्पांची माहिती दिली आणि या उपक्रमांमुळे कायदेशीर संकल्पना आणि वास्तविक जगाच्या परिस्थितीत त्यांचे व्यावहारिक अनुप्रयोग कसे सखोल होतील हे अधोरेखित केले. त्यांनी डीएलएलईसाठी नावनोंदणी प्रक्रियेची सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आवश्यक पावले आणि कागदपत्रांची माहिती दिली. ओरिएंटेशन कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला.

## विद्यालयांमध्ये वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारताचे माजी राट्रपती, मिसाईल मॅन डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस १५ ऑक्टोबर हा वाचन प्रेरणा दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. दरवर्षीप्रमाणेच याही वर्षी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) इंग्रजी माध्यमात हा दिवस साजरा केला गेला.

मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन केले. ग्रंथपाल रूचिता घोलप यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. पर्यवेक्षिका निरजा अदुरी यांनी वाचनाचा छंद हा सर्वात चांगला छंद म्हणून प्रत्येक विद्यार्थ्याने जोपासावा तसेच भाोवर प्रभुत्व मिळवण्यासाठी वाचन हा एकमेव पर्याय असल्याचे सांगितले.

मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी विद्यार्थ्याने रोज कमीत कमी अर्धा तास वाचन केलेच पाहिजे, असे सांगत वाचनालयाचे नूतनीकरण केल्याबद्दल चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे तसेच संस्थेच्या सर्व संचालक मंडळाचे आभार मानले. पहिल्या दोन तासिकांना पाठ्यपुस्तकेतर पुस्तकांचा वाचन सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यात सर्व विद्यार्थ्यांनी सहभागी घेतला.

विद्यार्थ्यांनी ग्रंथालयातील काही निवडक लेखकांची पुस्तके घेऊन ती वाचून त्यावरील त्यांचा अभिप्राय आणि समीक्षण पीडीएफ स्वरूपात सादर केले. या वेळी सीकेटी शैक्षणिक संकुलातील पर्यवेक्षिका निरजा अदुरी, ग्रंथपाल निलेशा पाटील, शिल्पा जाधव, विज्ञान प्रयोगशाळा सहाय्यक अमीत घरत तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ग्रंथालय समितीच्या वतीने डॉ. एपीजे अब्दुल कलाम जयंती म्हणजे वाचन प्रेरणा दिन विविध वाचनविषयक उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

सरस्वती आणि डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केल्यानंतर महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांच्या हस्ते ग्रंथालयात विविध विषयांवरील ग्रंथ, संदर्भसाहित्य, टॉकिंग बुक्स, ई-बुक्स, नियतकालिके इ. वाचनसाहित्याचा समावेश असलेल्या ग्रंथप्रदर्शनाचे उद्‌घाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी, डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचा विद्यार्थी ते थोर शास्त्रज्ञ आणि राष्ट्रपती ते भारतरत्न असा प्रवास केवळ थक्क करणारा आहे. आपण यातून प्रेरणा घेऊन त्यांचे काही गुण आत्मसात करू शकतो. आपला देश सर्व क्षेत्रात पुढे जावा याविषयी सतत विचार करणारे आणि विद्यार्थ्यांमध्ये रमणारे असे डॉ. कलाम होते. हे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना आपल्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा व्यक्त करून अभ्यासाव्यतिरिक्त आपल्या आवडत्या विषयाचे वाचन नियमित करावे, असे आवाहन केले.

या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. पूजा लांजेकर यांनी केले, तसेच ग्रंथपाल वैभव झगडे तसेच समितीतील इतर सर्व सदस्यांनी सहकार्य केले.



## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात पारितोषिक वितरण समारंभ





**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात वाचन प्रेरणा दिनानिमित्त ग्रंथ प्रदर्शन व शालांतर्गत स्पर्धांमधील विजेत्या स्पर्धकांना पारितोषिक वितरण समारंभ मंगळवारी (दि.१५) झाला.

मुख्याध्यापिका रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभामध्ये ग्रंथालय विभागाच्या प्रमुख उपशिक्षिका वेदांगी म्हात्रे यांनी विद्यालयातील विविध ग्रंथांचे प्रदर्शन लावले होते. विद्यार्थ्यांनी यातून पुस्तके घेऊन वाचनाचा आनंद घेतला.

डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात आलेल्या वाचन प्रेरणा दिनाची माहिती वेदांगी म्हात्रे यांनी आपल्या प्रास्ताविकातून समजावून सांगितली. त्यानंतर इयत्ता आठवीतील विद्यार्थिनी वैष्णवी देवकर हिने डॉ. एपीजे. अब्दुल कलाम यांच्या जीवन कार्याची माहिती आपल्या भाषणातून विषद केली.

मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर यांनी वाचनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले व महावाचन उपक्रमात सर्वात जास्त पुस्तके वाचलेल्या इयत्ता दहावीतील विद्यार्थिनी गौरी कोळी हिला शैक्षणिक साहित्य बक्षीस देऊन तिचे अभिनंदन केले.

विद्यार्थ्यांनी प्रथम सत्रात ज्या ज्या शालांतर्गत स्पर्धांमध्ये भाग घेतला होता अशा सर्व विजेत्या स्पर्धकांना बक्षीस वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांची सत्र परीक्षा सुरू होत आहे. अशा वेळी या शैक्षणिक साहित्यांचा विद्यार्थ्यांना उपयोग होईल, अशी अपेक्षा ठाकूर मॅडम यांनी व्यक्त केली.

## संपादकीय

# निव्वळ अंतर्गत राजकारण

खलिस्तानींच्या मुद्यावरून भारत आणि कॅनडा यांच्यातील संबंधांत पुन्हा एकदा वितुष्ट आले आहे, परंतु असे होण्याची ही पहिलीच वेळ नाही हे मात्र त्यासंदर्भात लक्षात घेतले पाहिजे. पुढच्या वर्षी कॅनडात निवडणूक असून कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो अंतर्गत राजकारणाच्या दृष्टीने ही खेळी खेळत आहेत. कॅनडात साडेसात लाखांहून अधिक संख्येने असलेल्या शीख समाजाची मते मिळवण्यासाठीचा हा खटाटोप आहे.

**भारत आणि कॅनडा यांच्यातील संबंध पुन्हा एकदा ताणले गेले आहेत. यापूर्वीही ते याच मुद्यावर ताणले गेले आहेत. तेथील अंतर्गत राजकारणात पुन्हा पुन्हा याच मुद्याचा वापर का आणि कसा होतो हे समजून घेण्यासाठी थोडी पार्श्वभूमी ध्यानात घ्यावी लागेल. अलीकडेच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांची आसिआन परिषदेच्या निमित्ताने लाओस येथे भेट झाली. त्यावेळीच सध्या चव्हाट्यावर आलेल्या कडवटपणाची सुरूवात झाली होती. कॅनडाचे सरकार शीख फुटीरतावाद्यांच्या कारवाया रोखत नाही तोपर्यंत उभय देशांमध्ये सकारात्मक चर्चा होणे शक्य नाही अशी भूमिका त्यावेळी भारताने घेतली. तर ट्रुडो यांनी मात्र तेव्हाही खलिस्तानवादी हरदीपसिंग निज्जर तपासासंदर्भात मोदींशी चर्चा झाल्याचे सांगितले. ट्रुडोंनी हा विषय लावून धरण्यामागे निव्वळ तेथील अंतर्गत राजकारण आहे. पुढील वर्षी त्या देशात निवडणुका आहेत. त्यात ट्रुडो यांच्या लिबरल पार्टीला यश मिळण्याची शक्यता कमीच आहे. ट्रुडो यांच्याकडे पक्षाचे नेतृत्व राहिल्यास पक्षाला सत्ता मिळणार नाही असे म्हणत त्यांच्या पक्षातील नेतेही त्यांचा राजीनामा मागत आहेत. या अशा दबावाच्या परिस्थितीमुळे ट्रुडो आपले वडील पियर ट्रुडो यांनी ऐंशीच्या दशकात खेळलेली खेळीच आता पुन्हा खेळत आहेत. कॅनडातील शीख फुटिरतावाद्यांचा पाठिंबा मिळवायचा तर भारतावर टीका करण्याचे धोरण अंगिकारावे लागते. त्याच हेतूने ट्रुडो हे राजकारण खेळीत आहेत. निज्जरच्या हत्येशी भारताचा संबंध आहे असा आरोप कॅनडा गेले कित्येक महिने करत आहे. तेथील भारतीय दूतावासातील उच्चायुक्त संजयकुमार वर्मा यांचा या हत्येशी संबंध जोडण्याचा प्रयत्नही केला गेला. ही परिस्थिती लक्षात घेऊन भारताने वर्मा यांच्यासहित तेथील आपल्या सहा मुत्सद्दी अधिकाऱ्यांना परत बोलावले तसेच नवी दिल्ली येथील कॅनडाच्या उच्चायुक्तालयामधील सहा जणांची हकालपट्टी केली. हे सारेच उभय देशांच्या संबंधात मोठे वितुष्ट आल्याचे निदर्शक आहे, परंतु प्रत्यक्षात दोन्ही देशांत खूप टोकाचे असे काहीही घडलेले नाही. आपल्या नागरिकांविरोधात भारत छुप्या कारवाया करत असल्याचा आरोप ट्रुडो यांनी आता केला. तो अर्थातच भारताने लागलीच फेटाळला आहे. आगामी निवडणुकीत यश न मिळण्याच्या शक्यतेमुळे अस्वस्थ झालेले ट्रुडो अकारण राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्याकडे त्यांच्या देशातील नागरिकांचे लक्ष वळवू पाहात आहेत. या मागे निव्वळ आणि निव्वळ त्यांचे अंतर्गत राजकारण आहे. कॅनडातील महागाई व बेरोजगारी या समस्यांमुळे ट्रुडो यांची लोकप्रियता घटली आहे. त्यामुळे ट्रुडो आपल्या पक्षाच्या मतदारांना टिकवून ठेवण्यासाठी धडपडत आहेत. त्यांचे वडील पियर ट्रुडो हे देखील त्यांच्या कार्यकाळात हीच खेळी खेळत. निज्जर हत्या प्रकरणाचा संबंध भारताशी जोडण्याच्या राजकारणाची ही पार्श्वभूमी आहे. ट्रुडो हे सारे अतिशय अप्रगल्भतेने करीत असल्यामुळे दोन्ही देशांमध्ये मात्र पराकोटीचा कडवटपणा निर्माण झाला आहे.**

# आचारसंहिता : काय करावे, काय करू नये

भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. तेव्हापासून राज्यात निवडणूक आचारसंहिता सुरू झाली आहे. त्यामुळे निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत उमेदवारांनी आणि राजकीय पक्षांनी 'काय करावे, काय करू नये,' याबाबतची आयोगाने तयार केलेली सूची वानगी दाखल पुढीलप्रमाणे आहे.

**काय करावे**

१) निवडणुका घोषित होण्यापूर्वी क्षेत्रात प्रत्यक्षपणे सुरू करण्यात आलेले कार्यक्रम पुढे चालू ठेवता येतील.

२) पूर, अवर्षण, रोगाची घातक साथ किंवा इतर नैसर्गिक आपत्ती यांच्यामुळे प्रभावित झालेल्या क्षेत्रांतील जनतेसाठी पीडा निवारण आणि पुनर्वसन कार्य सुरू करता व चालु ठेवता येऊ शकेल.

३) मरणासन्न किंवा गंभीररित्या आजारी असलेल्या व्यक्तींना उचित मान्यतेने रोख रक्कम किंवा वैद्यकीय सुविधा देणे चालू ठेवता येऊ शकेल.

४) मैदानासारखी सार्वजनिक ठिकाणे निवडणूक सभा घेण्यासाठी सर्व पक्षांना/ निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना निपक्ष:पातीपणे उपलब्ध झाली पाहिजेत. त्याचप्रमाणे हेलिपॅडचा वापरही सर्व पक्षांना/ निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना निपक्ष:पातीपणे करता आला पाहिजे.

५) इतर राजकीय पक्ष आणि उमेदवार यांच्यावरील टिका, त्यांची धोरणे, कार्यक्रम पूर्वीची कामगिरी आणि कार्य यांच्याशीच संबंधित असावी.

६) शांततापूर्ण आणि उपद्रवरहित गृहस्थजीवन जगण्याचा प्रत्येक व्यक्तीचा अधिकार पूर्णपणे जतन करण्यात यावा.

७) स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांना प्रस्तावित सभांची जागा आणि वेळ याबाबत पुरेशी आगाऊ सूचना देऊन आवश्यक ती परवानगी घेतलेली असावी. प्रस्तावित सभेच्या जागी कोणतेही निर्बंध किंवा प्रतिबंधक आदेश जारी केलेले असल्यास त्याचे पूर्णपणे पालन करण्यात यावे. आवश्यक असल्यास त्याबाबत सूट मिळण्याकरिता अर्ज केला पाहिजे आणि अशी सूट वेळीच मिळवावी. प्रस्तावित सभेसाठी ध्वनिवर्धकांचा वापर करण्याची आणि अशा इतर कोणत्याही सुविधांसाठी परवानगी मिळवावी.

८) सभांमध्ये अडथळे आणणाऱ्या किंवा सुव्यवस्था बिघडवणाऱ्या व्यक्तींचा बंदोबस्त करण्यासाठी पोलिसांची मदत घेण्यात यावी.

९) मिरवणूक सुरु होण्याची वेळ आणि जागा, ती जेथून जाणार असेल तो मार्ग आणि ती जेथे संपणार असेल ती वेळ आणि जागा अगोदर निश्चित करण्यात येईल आणि पोलीस प्राधिकाऱ्यांकडून त्यासाठी आगाऊ परवानगी घेण्यात यावी. मिरवणूक जेथून जाणार असेल त्या भागांमध्ये कोणताही निर्बंधक आदेश जारी असल्यास, त्याबाबत खात्री करुन घेऊन, त्याचे पूर्णपणे अनुपालन करण्यात यावे. त्याचप्रमाणे वाहतूक विनियम आणि इतर निर्बंध यांचेही अनुपालन करण्यात यावे. मिरवणुकीमुळे वाहतुकीला अडथळा होऊ देऊ नये, मतदान शांततापूर्ण आणि सुनियोजित रितीने पार पडावे यासाठी निवडणूक अधिकाऱ्यांना नेहमीच सहकार्य करावे, सर्व कार्यकर्त्यांनी बिल्ले व ओळखपत्र ठळकपणे लावावीत.

१०) मतदारांना पुरविण्यात आलेल्या अनौपचारिक ओळखचिठ्ठ्या साध्या (पांढऱ्या) कागदावर असाव्यात आणि त्यावर कोणतेही चिन्ह, उमेदवाराचे नाव किंवा पक्षाचे नाव असू नये. प्रचाराच्या कालावधीमध्ये व मतदानाच्या दिवशी वाहने चालविण्यावरील निर्बंधाचे पूर्णत: पालन करण्यात यावे.

११) निवडणूक आयोगाकडून वैध प्राधिकारपत्र मिळविलेल्या व्यक्तींनाच फक्त मतदार, उमेदवार व त्यांचे निवडणूक/ मतदार प्रतिनिधी यांव्यतिरिक्त कोणत्याही मतदान कक्षात प्रवेश करता येईल. इतर व्यक्ती कितीही उच्चपदस्थ असली तरी (उदा. मुख्यमंत्री, मंत्री, खासदार किंवा आमदार इत्यादी) तिला अटीतून सूट मिळणार नाही.

१२) निवडणुका घेण्याविषयीची कोणतीही तक्रार किंवा समस्या, आयोग/ निवडणूक निर्णय अधिकारी/ क्षेत्र/ प्रक्षेत्र दंडाधिकारी/ भारत निवडणूक आयोग यांनी नियुक्त केलेल्या निरीक्षकांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात. निवडणूक आयोग/ निवडणूक निर्णय अधिकारी/ जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या निवडणुकीच्या विविध पैलूंशी संबंधित असलेल्या सर्व बाबींविषयीचे निर्देश/ आदेश/ सूचना यांचे पालन करण्यात यावे.

**काय करू नये**

१) सत्ताधारी पक्ष/शासन यांनी केलेल्या कामगिरीविषयी सरकारी राज्यकोषातील खर्चाने कोणतीही जाहिरात व सर्व जाहिराती काढण्यास प्रतिबंध आहे. कोणताही मंत्री तो किंवा तो उमेदवार असल्याशिवाय किंवा फक्त मतदानासाठी मतदार म्हणून आला असेल त्याशिवाय मतदान कक्षात किंवा मतमोजणीच्या जागी प्रवेश करणार नाही.

२) शासकीय कामाची निवडणूक मोहीम, निवडणूक प्रचार कार्यासोबत सरमिसळ करू नये.

३) मतदाराला, पैशाचे किंवा अन्य कशाचेही प्रलोभन दाखवू नये.

४) मतदारांच्या जातीय समूह भावनांना आवाहन करु नये. वेगवेगळ्या जाती समूह किंवा धार्मिक किंवा भाषिक गट यांच्यामधील विद्यमान मतभेद वाढतील किंवा परस्पर द्वेष किंवा तणाव निर्माण करतील असे कोणतेही काम करण्याचा प्रयत्न करु नये.

५) इतर पक्षांचे नेते किंवा कार्यकर्ते यांच्या सार्वजनिक जीवनाशी संबंधित नसलेल्या खाजगी आयुष्याच्या कोणत्याही पैलूंवर टीका करण्याची परवानगी दिली जाणार नाही. इतर पक्ष किंवा त्यांचे कार्यकर्ते यांच्यावर, आंधळेपणाने केलेले आरोप आणि विपर्यस्त माहिती यांच्या आधारावर टिकाटिप्पणी करु नये.

६) मंदिरे, मशिदी, चर्च, गुरुद्वार किंवा इतर कोणतेही प्रार्थनास्थळ यांचा वापर निवडणूक प्रचाराची भाषणे, भित्तीपत्रके, संगीत यांच्यासह निवडणूक प्रचाराची जागा म्हणून केला जाणार नाही.

७) मतदारांना लाच देणे, मतदारांवर गैरवाजवी दडपण, मतदारांना धाकदपटशा दाखविणे, तोतयागिरी, मतदार केंद्रापासून १०० मीटर्सच्या आत प्रचार करणे, मतदान समाप्त करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेच्या आधीच्या ४८ तासात सार्वजनिक सभा घेणे आणि मतदारांची मतदान केंद्रावर ने-आण करण्यासाठी वाहनाची व्यवस्था करणे यासारख्या भ्रष्ट आणि निवडणूक अपराध समजल्या जाणाऱ्या गोष्टींना मनाई आहे.

८) लोकांच्या मतांचा किंवा त्यांच्या कामांचा निषेध करण्यासाठी त्यांच्या घरासमोर निदर्शने करणे किंवा धरणे यांचा कोणत्याही परिस्थितीत अवलंब केला जाणार नाही.

९) स्थानिक कायद्यांच्या अधीन राहून कोणत्याही व्यक्तीची जमीन, इमारत, आवार भिंत, वाहने इत्यादींच्या मालकाच्या विशिष्ट परवानगीशिवाय (जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला दाखविण्यासाठी व त्यांच्याकडे जमा करण्याकरिता) ध्वजदंड उभारण्यासाठी, निशाण्या लावण्यासाठी, सूचना चिकटविण्यासाठी, घोषणा लिहिण्यासाठी कोणीही वापर करणार नाही.

१०) इतर राजकीय पक्ष आणि उमेदवार यांनी आयोजिक केलेल्या सार्वजनिक सभा किंवा मिरवणुका यांच्यामध्ये कोणताही अडथळा निर्माण करु नये.

११) ज्या ठिकाणी इतर पक्षांच्या सभा घेतल्या जात असतील अशा ठिकाणांहून मिरवणूक नेऊ नये. मिरवणुकीतील लोक, क्षेपणास्त्र किंवा शस्त्र म्हणून ज्याचा दुरुपयोग केला जाऊ शकतो अशा कोणत्याही वस्तू जवळ बाळगण्यात येऊ नयेत.

१२) इतर पक्षांनी व उमेदवारांनी लावलेली भिंतीपत्रके काढून टाकू नयेत अथवा विद्रुप करु नयेत.

१३) मतदानाच्या दिवशी ओळखचिठ्ठ्या वाटपाच्या ठिकाणी किंवा मतदान कक्षाच्या जवळ भित्तीपत्रके, ध्वज, चिन्हे आणि इतर प्रचार साहित्य यांचे प्रदर्शन करु नये.

१४) निवडणुकीच्या काळात दारुचे वाटप केले जाणार नाही. ज्या व्यक्तीच्या सुरक्षिततेला धोका असल्याबाबत खात्री पटली आहे आणि म्हणून तिला सरकारी सुरक्षा पुरविण्यात आली आहे अशी कोणतीही व्यक्ती मतदानाच्या दिवशी, त्याच्या सुरक्षा कर्मचारीवर्गासह मतदान केंद्र असलेल्या जागेच्या परिसरात (१०० मीटर्सच्या आत) प्रवेश करणार नाही. तसेच, अशी कोणतीही व्यक्ती, मतदानाच्या दिवशी, त्याच्या सुरक्षा कर्मचारीवर्गासह मतदारसंघामध्ये फिरणार नाही.

१५) ज्या व्यक्तीच्या सुरक्षिततेला धोका असल्याबाबत खात्री पटली आहे आणि म्हणून तिला सरकारी सुरक्षा पुरविली आहे किंवा त्या व्यक्तीकडे खाजगी सुरक्षा रक्षक आहेत अशा कोणत्याही व्यक्तीची निवडणूक प्रतिनिधी किंवा मतदान प्रतिनिधी किंवा मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यात येऊ नये.

सदरील सूची केवळ वानखीदाखल असून ती सर्वसमावेशक नाही. याबाबत कोणतीही शंका असल्यास भारत निवडणूक आयोग किंवा राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडून मान्यता घेण्यात यावी.

**(साभार : विकासपिडीया)**

## बदलते तंत्रज्ञान

# व्हिडीओ कॉलसाठी आणलंय खास फीचर

इन्स्टंट मॅसेजिंग ॲप व्हॉट्सप आता आयुष्याचा एक महत्त्वापूर्ण भाग झाला आहे. कुटुंब, मित्रपरिवार असो की कार्यालयीन काम, प्रत्येक ठिकाणी व्हॉट्सपचा उपयोग केला जात आहे. युजर्सचा अनुभव आणखी चांगला व्हावा यासाठी कंपनी ॲपमध्ये सोईस्कर बदल करीत असते. आताही कंपनी व्हिडीओ कॉलिंगसंबंधीचे एक नवीन फीचर घेऊन आली आहे. त्यानुसार युजर्स व्हिडीओ कॉलदरम्यान लाईटची अनोखी सेटिंग करू शकणार आहेत.




नावाप्रमाणेच लो-लाइट मोडचा उद्देश कमी प्रकाशात कॉलदरम्यान व्हिडीओची गुणवत्ता वाढवणे हा आहे. या फीचरची चाचणी घेत असताना जाणवलं की, हे फीचर व्हिडीओ कॉलदरम्यान ब्राइटनेस सुधारेल, तुमचा चेहरा अधिक उजळ दिसेल आणि अंधारात व्हिडीओच्या स्पष्टतेमध्ये व्यत्यय आणणाऱ्या गोष्टी टाळण्यास मदत करील. म्हणजेच तुम्ही अंधारात व्हिडीओ कॉलदरम्यान तुमच्या मित्र व कुटुंबातील सदस्यांना पाहू शकतात.

व्हॉट्सपवर लो-लाइट मोड एनेबल कसं करायचं?

व्हॉट्सप उघडा. कोणत्या तरी व्यक्तीला व्हिडीओ कॉल करून पाहा. तुमचा व्हिडीओ फीड फूल स्क्रीन करा. त्यानंतर लो-लाइट मोड सक्रिय करण्यासाठी वरच्या उजव्या कोपऱ्यात असलेल्या 'बल्ब' चिन्हावर टॅप करा. फीचर डिसेबल करण्यासाठी फक्त बल्ब चिन्हावर पुन्हा टॅप करा.

वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मवर लो-लाइट मोडबद्दलची माहिती

व्हेलिबिलिटी : लो-लाइट मोड हे फीचर आयओएस व ॲण्ड्रॉईड व्हर्जन अशा दोन्हीवर उपलब्ध असेल.

विंडोज ॲप : विंडोज पवर हे फीचर उपलब्ध नसेल. त्यामुळे तुम्हाला व्हिडीओ कॉलवर बोलताना ब्राईटनेस डजेस्ट करावा लागेल.

टेम्परररी क्टिव्हेशन : लो-लाइट मोड प्रत्येक कॉलसाठी सुरु करावा लागतो, कारण सध्या याला कायम सक्षम ठेवण्याचा पर्याय अद्याप दिलेला नाही.

या नवीन लो-लाइट मोडच्या साह्याने युजर्सना कमी प्रकाशातही व्हिडीओ कॉलवर बोलणं सोपे होणार आहे. त्यामुळे पुढच्या वेळी तुम्ही कमी प्रकाशात असलेल्या खोलीत असाल तर हे उपयुक्त फीचर सक्रिय करायला विसरू नका, जेणेकरून अधिक व्यवस्थित व्हिडीओ कॉलचा अनुभव मिळू शकेल.

# गायनाचार्य पं. भास्करबुवा बखले

## निमित्त



एक अष्टपैलू, चतुरस्त्र प्रतिभेचे श्रेष्ठ गायक कलावंत; गायनाचार्य व अभिजात नाट्यसंगीताच्या परंपरेचे प्रवर्तक अशी पं भास्करबुवा बखले यांची ओळख राहिली आहे. त्यांची आज जयंती. यानिमित्ताने घेतलेला आढावा.

भास्करबुवांचा जन्म १७ ऑक्टोबर १८६९ बडोदे संस्थानातील कठोर या गावी झाला. घरची गरिबी असल्याने प्राथमिक शालेय शिक्षण व त्यानंतर संस्कृत पाठशाळेतले शिक्षण त्यांना फार कष्टाने करावे लागले. त्यांचा आवाज लहानपणापासून गोड असल्यामुळे वर्गशिक्षक त्यांना वारंवार संस्कृत श्लोकपठण करायला लावीत. त्यांच्या या गुणांमुळे पिंगळेबुवा नावाच्या हरिदासाकडे त्यांची संगीत शिक्षणाची सोय झाली. भास्करबुवांच्या आवाजाची कीर्ती पुढे किर्लोस्कर संगीत नाटक मंडळीतील भाऊराव कोल्हटकर यांच्या कानी गेली आणि त्यांनी भास्करबुवांना मंडळींत आणले. मंडळीचा मुक्काम इंदूरला असताना भास्करबुवांचा आवाज सुप्रसिध्द बीनकार उस्ताद बंदे अलीखाँ यांनी ऐकला आणि स्वतः होऊन त्यांनी भास्करबुवांना संगीतशिक्षणासाठी गंडा बांधला. किर्लोस्कर नाटक मंडळीच्या रामराज्यवियोग या नाटकात त्यांनी मंथरेची, तर संगीतसौभद्र या नाटकात नारदाची भूमिका केली. सुमारे दोन वर्षे त्यांनी किर्लोस्कर नाटक मंडळीमध्ये काम केले (साधारणतः सप्टेंबर १८८४ ते ऑक्टोबर १८८६). त्यांचा आवाज फुटल्यामुळे त्यांनी ही नाटक मंडळी सोडली. उच्च दर्जाची गायनकला शिकण्यासाठी ते पुन्हा बडोद्यास आले आणि ग्वाल्हेर घराण्याचे गायक उस्ताद फैजमहंमदखाँ यांचे त्यांनी शिष्यत्व पतकरले. चिकाटीने, मेहनतीने व निष्ठेने त्यांनी खाँसाहेबांकडून विद्या प्राप्त केली आणि खानदानी गवयी म्हणून लौकीक प्राप्त केला. त्यांनी गायलेली नाथ हा माझा, मम आत्मा गमला ही नाट्यपदे खूप गाजली.

उस्ताद फैजमहंमदखाँकडून संगीताचे शिक्षण घेतल्यानंतर त्यांच्याच मार्गदर्शनावरून भास्करबुवांनी आग्रा घराण्याचे उस्ताद नथ्थनखाँ आग्रेवाले यांचा गंडा बांधला. त्यांच्याच सूचनेनुसार त्यांच्या मृत्यूनंतर, भास्करबुवांनी जयपूर घराण्याचे उस्ताद अल्लादियाखाँ यांना गुरू केले आणि त्यांच्या गायकीचे मर्मही आत्मसात केले.

भास्करबुवांनी विद्यादानही मुक्तपणे केले. आरंभी किर्लोस्कर आणि नंतर गंधर्व नाटक मंडळीचे ते संगीत गुरू होते. विद्याहरण, स्वयंवर, द्रौपदी यांसारख्या संगीतनाटकांना संगीत देऊन तसेच बालगंधर्व, मास्तर कृष्णराव, गोविंदराव टेंबे यांच्यासारख्या समर्थ कलावंतांना तालीम आणि मार्गदर्शन देऊन मराठी नाट्यसंगीताचे दर्जेदार स्वरूप त्यांनी घडविले व नाट्यसंगीतात सौंदर्ययुक्त व भरीव अशी कामगिरी केली. नाट्यसंगीत त्यांनी अभिजात संगीताच्या पातळीवर नेऊन ठेवले. त्यांनीच घडविलेले हे नाट्यसंगीताचे स्वरूप आजही कमी अधिक फरकाने कायम असल्यामुळे त्यांना नाट्यसंगीताचे 'कुलस्वामी' म्हणून संबोधता येईल. मास्तर कृष्णराव, बालगंधर्व, बागलकोटकर, पाटणकरबुवा बापूराव केतकर वगैरे त्यांची शिष्यमंडळी विख्यात होती. गोविंदराव टेबें, र. कृ. फडके, केशवराव भोळे वगैरे कलावंत त्यांना गुरुस्थानी मानीत असत. रसिकांनी त्यांना 'देवगंधर्व' ही मानाची पदवी दिली.

भास्करबुवांनी धारवाड येथील ट्रेनिंग कॉलेजात काही काळ संगीत शिक्षक म्हणून नोकरीही केली (१९०६-०८). त्यांनी पुणे येथे भारत गायन समाज या संस्थेची स्थापना केली (१९११). भास्करबुवांचे पुणे येथे ८ एप्रिल १९२२ रोजी निधन झाले. संस्था दरवर्षी त्यांच्या स्मरणार्थ देवगंधर्व संगीत महोत्सवाचे आयोजन करते.

**-सुधीर पोटे (मराठी विश्वकोष)**

## क्लिक...क्लिक...!




**पनवेल : यंदा पडलेल्या दमदार पावसामुळे जलाशयांमध्ये चांगला पाणीसाठा जमा झाला असून निसर्गही डौलाने बहरला आहे. याचे शहरातील गाढी नदीच्या तिरावरून टिपलेले प्रातिनिधिक छायाचित्र.**

## आरोग्य प्रहर

# पाठीच्या दुखण्यावर या गोष्टी रोज करा

हल्ली पाठदुखीची समस्या लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच जाणवतेय. विशेषत: ऑफिसमध्ये तासन्‌तास कम्प्युटर, लॅपटॉपसमोर बसून काम करणाऱ्यांमध्ये पाठदुखीचे प्रमाण सर्वाधिक आहे. सकाळी आवरून ऑफिस गाठल्यानंतर ते पुढे रात्र होईपर्यंत आपण ऑफिसमध्ये एका खुर्चीवर अनेक तास बसून काम करतो. अशाने पाठीवर खूप ताण येत असतो.



पाठदुखीमागेही इतरही काही कारणं असू शकतात, जसे की व्यायामाचा अभाव, खुर्चीत बसताना नीट पाठ टेकून न बसता अवघडल्यासारखे बसणे, अशानेही पाठदुखीची समस्या वाढते, पण तुम्हाला माहीत आहे का, तुम्ही व्यायाम न करता रोजची ४० मिनिटे स्वत:साठी देऊन पाठदुखीची समस्या कमी करू शकता, असे एका संशोधनातून समोर आले आहे.

या विषयावर अपोलो हॉस्पिटल्सचे सिनिअर न्यूरोलॉजिस्ट डॉ. सुधीर कुमार म्हणाले की, बसण्याची वेळ कमी करणे, अधूनमधून चालण्यासाठी ब्रेक घेणे, वजन नियंत्रणात ठेवणे आणि पाठीच्या स्नायूंना बळकटी देणारा व्यायाम करणे; या सर्व गोष्टींमुळे तुमची पाठदुखीची समस्या कमी होऊ शकते.

यावर संशोधकांनी असे सुचवले की, फक्त उभे राहण्यापेक्षा चांगली कोणतीही शारीरिक क्रिया, मग ती चालणे किंवा अधिक वेगवान व्यायाम प्रकार असो तुम्ही रोज ४० मिनिटे केला पाहिजे. पाठीच्या दुखण्यावर केवळ एखादा चांगला व्यायाम प्रकार शोधण्यापेक्षा बसण्याची पद्धत आधी बदलली पाहिजे आणि मधेमधे ब्रेक घेतला पाहिजे, जागेवरून उठलं पाहिजे.

संशोधकांनी सांगितले की, कामाच्या ठिकाणी स्टँडिंग डेस्क आणि ब्रेक देण्याची सिस्टीम लागू केली पाहिजे. जवळच्या ठिकाणी कुठे जायचे असल्यास कार किंवा सार्वजनिक वाहनाचा वापर करण्यापेक्षा सायकलचा पर्याय निवडणे केव्हाही चांगले आहे. तासनतास एका ठिकाणी बसून काम करणाऱ्यांना डॉ. कुमार असे सुचवतात की, काम करत असताना ३०-४५ मिनिटांनी खुर्चीवरून उठा. तीन मिनिटे फिरा (सौम्य गतीने चाला) किंवा १० स्क्वॅट्स मारा आणि परत खुर्चीवर येऊन बसा. बसून राहण्याचा वेळ कमी करण्याचे इतर मार्ग म्हणजे उभे राहून कॉफी ब्रेक घेणे, लिफ्टच्या जागी पायऱ्यांचा वापर करणे आणि कोणतीही शंका, अडचण असल्यास कॉल किंवा व्हॉटसप मेसेज न करता सहकाऱ्यांच्या डेस्कजवळ जाऊन विचारणे, तुम्ही बॅक एक्स्टेंशन एक्सरसाइडच्या मदतीनेही पाठीचे स्नायू मजबूत करू शकता. हे तुम्ही घरीदेखील सहज करू शकता.

# अलिबाग विधानसभा मतदारसंघात महिला मतदारांची संख्या वाढली

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग-मुरूड विधानसभा मतदारसंघात पुरुष मतदरांपेक्षा महिला मतदारांची संख्या जास्त आहे. या मतदारसंघात एकूण तीन लाख तीन हजार ७८९ इतके मतदार आहेत. यात एक लाख ४९ हजार ५५९ पुरुष मतदार तर एक लाख ५४ हजार २३० महिला मतदार आहेत. एकही तृतीय पंथी मतदार नाही. दोन मतदान केंद्र वाढली असून ३७५ मतदान केंद्र आहेत, अशी माहिती अलिबाग प्रांताधिकारी तथा अलिबाग-मुरूड विधानसभा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी मुकेश चव्हाण यांनी दिली.



अलिबाग-मुरूड विधानसभा मतदारसंघाची माहिती देण्यासाठी बुधवारी (दि.१६) पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी मुकेश चव्हाण यांनी ही माहिती दिली.

१९२ अलिबाग विधानसभा मतदार संघात अलिबाग, मुरुड व रोहा तालुक्यातील चणेरा मंडळाचा समावेश आहे. त्यापैकी अलिबागमध्ये २६६, मुरुड मध्ये ७२ तसेच रोहा तालुक्यात ३७ अशा एकुण ३७५ मतदान केंद्रांचा समावेश आहे.१९२ अलिबाग विधानसभा मतदार संघात एकूण १९६७ कर्मचारी असून प्रत्यक्ष कामकाजसाठी १५०० कर्मचारी मनुष्यबळ आवश्यक आहे. त्याचे माहिती अद्ययावत करण्याचे काम पुर्ण झाले आहे. मतदार संघात पुरुष एक लाख ४९ हजार ५५९ मतदार, महिला एक लाख ५४ हजार २३० मतदार आहेत. तृतीय पंथी एकही मतदार नाही. एकूण तीन लाख तीन हजार ७८९ इतके मतदार आहेत.

अलिबाग विधानसभा मतदारसंघातील उमेदवारी अर्ज २२ ऑक्टोबरपासून अलिबाग प्रांताधिकारी कार्यालयात स्विकारले जाणार आहेत. नेहुली येथील जिल्हा क्रीडा संकुलात २३ नोव्हेंबर २०२४ मतमोजणी होईल.

**मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी कार्यक्रम**

निवडणुक कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी १९२ अलिबाग विधानसभा मतदार संघात समित्या नेमण्यात आल्या आहेत. तसेच मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी जनजागृती करण्यात येणार आहेत. तसेच विविध कार्यक्रम घेण्यात येणार आहे. यामध्ये समाजातील सर्व घटकांचा समावेश करण्यात येणार आहे, अशी माहिती अलिबाग-मुरूड विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी मुकेश चव्हाण यांनी दिली.

## आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करा -जिल्हाधिकारी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ निपक्ष आणि पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सर्व शासकीय यंत्रणेने आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे तसेच सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी अतिशय सूक्ष्म नियोजन करावे. एकूणच निवडणूक प्रक्रिया सुरळीत होईल याची दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित विधानसभा निवडणूक आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बढे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, उप जिल्हा निवडणूक अधिकारी नितीन वाघमारे सर्व समन्वयक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी जावळे म्हणाले, निवडणूक आदर्श आचारसंहिता लागू झाल्यावर शासकीय इमारत परिसरातील जाहीरात परिसर, फलक काढावेत आणि आचारसंहितेच्या अंमलबजावणीसाठी भरारी पथकांची नियुक्ती करावी. सीव्हीजील ॲपवर येणाऱ्या तक्रारींच्या निवारणासाठी यंत्रणा कार्यान्वित करावी. निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींना त्याची माहिती देण्यात यावी. मुद्रणालयांच्या प्रतिनिधींची बैठक घेवून नियमातील तरतूदींची माहिती द्यावी.

जिल्हास्तरावर आणि निवडणूक निर्णय अधिकारी स्तरावरील नियंत्रण कक्ष २४४७ सुरू ठेवावेत. आर्थिक व्यवहारांवर नियंत्रण ठेवण्याबाबत बँक अधिकाऱ्यांची बैठक घेवून अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना द्याव्यात. स्ट्राँगरुमची व्यवस्था चोख करावी. सर्व स्तरावरील अधिकारी व कर्मचारी याचे निवडणूक विषयक प्रशिक्षण त्वरीत घेण्यात यावे. विविध परवानग्या देण्यासाठी ऑनलाईन व्यवस्था करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

निवडणूकीची घोषणा झाल्यानंतर शासकीय मालकीची कार्यालये, शासकीय इमारती आणि त्यांच्या संरक्षक भिंतीवरील जाहिराती, भित्तीपत्रके, कापडी फलक, कटआऊट, जाहिरात फलकावरील संदेश, झेंडे इत्यादी तात्काळ काढावीत. सार्वजनिक जागेवरील सर्व राजकीय जाहिराती, भित्तीपत्रके आदीदेखील काढावे. बसस्थानक, बसथांबा, रेल्वे पुल, एसटी महामंडळाच्या बसेस व विद्युत व टेलिफोन खांब, यावरील जाहिराती काढणे बंधनकारक आहे. याबाबत संबंधित यंत्रणेने तातडीने कार्यवाही करावी.

मालमत्ता विद्रुपण रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्य मालमत्ता विद्रुपीकरण प्रतिबंधक कायदा-१९९५ मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे. शासकीय संकेतस्थळावरील, राजकीय व्यक्तींचे छायाचित्र तसेच नावे वगळण्याची कारवाई करावी. शासकीय इमारतींचे सुरू असलेले बांधकाम, विविध विकास कामांसंदर्भातील माहिती संबंधित विभागाने तात्काळ जिल्हा निवडणक शाखेकडे कळवावी. आचारसंहिता काळात सर्व नियमाचे पालन करावे, असेही जावळे यांनी सांगितले.

### ‘राम प्रहर’च्या बातमीची दखल

## वाऱ्यामुळे कोसळलेल्या बॅनरची एमएसआरडीसी अधिकाऱ्यांकडून पाहणी

**चौक : प्रतिनिधी**

चौक कर्जत फाटा येथे जोरदार वाऱ्याने एक बॅनर लावलेले होर्डींग्ज कोसळून पडल्याने भितीचे वातावरण निर्माण झाले होते. त्याची बातमी दैनिक राम प्रहरमध्ये प्रसिध्द होताच एमएसआरडी अधिकाऱ्यांनी कोसळलेल्या बॅनरची पाहणी केली.



महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचे वरीष्ठ अधिकारी दिलीप शंकर, राजेंद्र सिंदकर या रस्त्याची देखभाल दुरुस्ती करणारे आईआरबीचे अधिकारी धावरे यांनी तातडीने येऊन पाहणी केली. तत्पूर्वी पडलेला होर्डींग्ज चौक पोलिसांनी काढून जमा केला. एमएसआरडी व आयआरबी यांच्या अधिकाऱ्यांनी वावंढळवाडी येथील पुलाच्या कट्ट्याची पाहणी करून या पुलाला रेलिंग करण्याचे कबूल केले व रस्त्यावर साठणारे पाणी याचीही दखल घेतली.

वावंढळवाडी स्टॉप वर दोन रस्त्यात् अजिबात अंतर नसल्याने रस्ता क्रॉसिंग करणे जीवावर बेतले आहे तसेच वावंढळ येथील वळणावर असलेला पुल सरळ करणे अथवा अपघाती वळण काढणे यावर योग्य ती उपाय योजना करण्याचे कबूल केले. हा विषय पत्रकार अर्जुन कदम व रामदास काईनकर यांनी सातत्याने मांडला आहे. होर्डिंग्ज काढण्याबाबत खालापूर आणि रसायनी पोलीस निरीक्षक यांना पत्र देण्यात आले आहे, तर होर्डींग्ज मालकांना नोटीस बजावण्यात येत आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार चौक येथे चौक कडून कर्जतला जाणाऱ्या चौक फाट्यावर हॉर्डींगचे साम्राज्य पसरले आहे. स्थानिक पातळीवर असणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांनी लक्ष देणे गरजेचे आहे. आता आयआरबी व एमएसआरडीसी यांचे अधिकारी काय कार्यवाही करतात हे पाहणे उचित ठरेल.

## थळ येथील आरसीएफ खत प्रकल्प विस्तारणार

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील थळ येथील आरसीएफ खत प्रकल्पाचा विस्तार होणार आहे. युरीआ आणि अमोनिया बरोबरच आता मिश्र खतांची निर्मिती या प्रकल्पातून केली जाणार आहे. यासाठी १००० कोटी रुपयाची गुंतवणूक केली जाणार असून, प्रकल्पातून दररोज १२०० मेट्रीक टन मिश्र खतं तयार केले जाणार आहे. कंपनीच्या संचालक मंडळाने एल अँन्ड टी कंपनीला हा प्रकल्प उभारणीचे कंत्राट दिले असून, २७ महिन्यात हे काम पूर्ण होणे अपेक्षित आहे.

केंद्र सरकारचा अंगिकृत उपक्रम असलेला राष्ट्रीय केमिकल्स आणि फर्टीलाझर्स लिमिटेड कंपनीचा मिश्र खत प्रकल्प रायगड जिल्ह्यात उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. थळ येथील आरसीएफच्या विद्यमान प्रकल्पाचा विस्तार करून या नवीन प्रकल्पाची उभारणी केली जाणार आहे. कुठलेही भुसंपादन केले जाणार आहे. यापुर्वी संपादीत केलेल्या जागेतच नवीन प्रकल्पाची उभारणी होणार आहे.

डिएपीसारख्या मिश्र खतांना बाजारात मोठी मागणी आहे, मात्र भारतात या मिश्र खताचे उत्पादन फारसे होत नसल्याने, हे खत मोठ्या प्रमाणात आयात करावे लागते. हीबाब लक्षात घेऊन आत्मनिर्भर भारत योजने आंतर्गत देशांतर्गत मिश्र खतांच्या निर्मितीवर भर देण्याचा निर्णय घेण्यात आला.

केंद्र सरकारने या मिश्र खत निर्मिती प्रकल्पा उभारणीस मान्यता दिली असून, कंपनीच्या संचालक मंडळाने नुकतेच प्रकल्प उभारणीच्या कंत्राट मंजूर केले आहे. त्यामुळे येत्या दोन महिन्यात प्रकल्प उभारणीच्या कामाला सुरुवात होऊ शकणार आहे.

## विविध पदांसाठी अर्ज करण्याचे माजी सैनिकांना आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

त्रिमुर्ती पावन प्रतीष्ठान संस्था अहमदनगर यांच्या पत्र ५ ऑक्टोबर २०२४ अन्वये माजी सैनिकांमधून सुरक्षा रक्षक, सैनिकी प्रशिक्षक, रेक्टर्स, विविध खेळाचे प्रशिक्षक व लिपीक इ.पदांवर माजी सैनिकांच्या नियुक्या करावयाच्या आहे.

याकरिता रायगड जिल्ह्यामधील इच्छूक माजी सैनिक उमेदवारांनी www.trimurtieducation.com या संकेतस्थळावर दि.३१ ऑक्टोबर २०२४ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, रायगड-अलिबाग ले.कर्नल राहुल वैजनाथ माने (निवृत) यांनी केले आहे.

माजी सैनिक उमेदवाराचे शिक्षण इयत्ता दहावी पास अथवा सैन्यदलाकडून समकक्ष प्रमाणपत्र असावे. भारतीय सेनेमध्ये कमीतकमी १५ वर्षे सेवा झालेली असावी. वय वर्ष ५० असावी, असे सांगण्यात आले आहे.

## डिकसळ येथील विकासकामांचे भूमिपूजन



**कर्जत : प्रतिनिधी**

डिकसळ गावातील शांतीनगर भागात विकास कामे आमदार महेंद्र थोरवे यांच्या माध्यमातून मंजूर झाली आहेत. त्या विकास कामांचे भूमिपूजन आचारसंहिता लागू होण्यापूर्वी शांतीनगर येथे आयोजित कार्यक्रमात करण्यात आले.

कर्जत तालुक्यातील उमरोली ग्रामपंचायत हद्दीमध्ये डिकसळ येथे पंचायत समिती सेस फंडातून अंतर्गत गटार पाच लाख या काम मंजूर आहे. उपस्थितांचे स्वागत आरपीआय शाखेचे अध्यक्ष मदन हिरे आणि कार्याध्यक्ष राजू चव्हाण यांनी केले.

या गटार बांधण्याच्या कामाचे भूमिपूजन कर्जत नगरपालिकेचे माजी नगरसेवक आणि आरपीआयचे कोकण कार्याध्यक्ष राहुल डाळिंबकर यांचे हस्ते श्रीफळ वाढवून झाले. या वेळी ग्रामपंचायत सदस्य भारती पाटील, कर्जत आरपीआयचे युवक अध्यक्ष अमर जाधव, माजी नगरसेवक अरविंद मोरे, उद्योजक समीर साळोखे सामाजिक कार्यकर्ते अमर साळोखे आदी उपस्थित होते.

या वेळी डिकसळ येथील भगवान गायकवाड, रमेश गायकवाड, हिराताई हिरे, ॲड. उत्तम गायकवाड, किशोर गायकवाड, विजय पाटील, निखिल गायकवाड, विनायक पाटील आदी उपस्थित होते.



**अलिबाग : तालुक्यातील नवेदर नवगांव येथील जेट्टीच्या दुरुस्तीकरीता सात कोटी ७७ लाखांचा निधी आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रयत्नाने उपलब्ध झाल्याने जनसंवाद मेळाव्यात आमदार महेंद्र दळवी यांचे कोळी बांधवांना कडुन जोरदार स्वागत करण्यात आले. या वेळी स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच समस्त कोळी बांधव व महिला वर्ग उपस्थित होते.**

## नेत्र चिकित्सा, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराला प्रतिसाद

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात हार्मोनी फाऊंडेशनकडून आयोजित नेत्र चिकित्सा आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरामध्ये ९४ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. त्यातील मोतिबिंदू दोष आढळलेल्या २२ रुग्णांना नवीन पनवेल येथे नेण्यात आले. आर झुनझुनवाला आय हॉस्पिटलच्या माध्यमातून नेत्र तपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया केल्या.



नेरळ येथील हार्मोनी फाऊंडेशन आणि आर झुनझुनवाला आय हॉस्पिटल यांच्या माध्यमातून १३५ वे नेत्र चिकित्सा शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिराचे उद्‌घाटन हार्मोनी फाऊंडेशनचे नितीन कांदळगावकर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी नम्रता कांदळगावकर, हर्षल कुलकर्णी, डॉ मोशिन सय्यद आदी उपस्थित होते. या शिबिरात रुग्णांची नेत्र तपासणी डॉ मोषिन तसेच आरोग्य पथकाचे विजय बामणे, गुरुनाथ घुटे, प्रवीण गेंद, अवंतिका गलांडे, नंदिनी देवघरकर, विश्वनाथ पाटील यांनी केली.

या शिबिरात क्यू प्रेशर थेरपिस्ट यांच्या हस्ते रोग निदान करण्यात आले. तेथे थेरपिस्ट मिलिंद पटवर्धन आणि अमित सकपाळ यांनी सोळा रुग्णावर उपचार केले. या शिबिराला भारतीय जनता पक्षाचे कर्जत तालुका अध्यक्ष राजेश भगत तसेच दत्ता ठमके, प्रवीण भोईर, सखाराम कडाली यांनी भेट देवून शुभेच्छा दिल्या.

## मोरे महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन



**रोहे : प्रतिनिधी**

एम.बी. मोरे महिला महाविद्यालयात ग्रंथालय समिती आणि सायन्स असोसिएशन च्या संयुक्त विद्यमाने भारताचे माजी राष्ट्रपती स्वर्गीय डॉ ए .पी. जे अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून मंगळवारी (दि.१५) साजरा करण्यात आली.

या वेळी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन प्रा. मेहरीन डावरे व प्रा. शुभम येरुणकर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी शफाक सिद्धकी या विद्यार्थिनीने वाचन प्रेरणा दिनाचे महत्त्व विद्यार्थिनींना सांगितले तसेच डॉ. कलाम यांचा प्रेरणादायी प्रवासावर आधारित लघुपट बायोग्राफी ऑफ डॉ ए पी.जे अब्दुल कलाम महाविद्यालयातील सभागृहात विद्यार्थिनींना दाखविण्यात आला.

कार्यक्रमाचे आयोजन ग्रंथपाल निर्मला थोरात आणि सायन्स असोसिएशन प्रमुख प्रा.विजेता पडवळ यांनी केले. या वेळी ४७ विद्यार्थिनी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, माझ्या अशीलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत १) श्री.बाळू बामा पाटील २) श्री. सत्यवान बामा पाटील ३) श्री. पिंट्या बामा पाटील, सर्व रा. केवाळे ता. पनवेल जि. रायगड यांच्यानावे अधिकार अभिलेखी नमूद असलेल्या भोगवटाधारकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. जिचे सविस्तर वर्णन खालील परिशिष्टामध्ये केलेले असून, यापुढे या जमिनीस संक्षिप्तपणे ’सदरहू मिळकत’ असे उल्लेखलीले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे. केवाळे, ता. पनवेल, जि. रायगड**

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर. पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ३३ | १३/अ | ०-२६-५० | ०.८३ |
| | | पो.ख. ०-०१-५० | |
| | | एकूण ०-२८-०० | |

तरी वरील सदरहू मिळकतीबाबत, अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, इजमेंट, समझोता करार, साठेकरार, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांच्या आत, खाली सही करणार, खरेदीदारांचे वकील यांच्या खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह, लेखी हरकती रजिस्टड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे, मुदतीत हरकती प्राप्त न झाल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे, असे समजून आमचे अशील सदर मिळकती संदर्भातील सर्व व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

**दिनांक : १७/१०/२०२४**

**सही /-**
**ॲड. सदिच्छा दिलीप अस्वले,**
२०३, मोहिनील अपार्टमेंट,
नवे पोपुड, म्हातवली, उरण,
रायगड पिन कोड- ४००७०२
मोबाईल नं. ७६६६०१०२९३

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, माझ्या अशीलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत १) श्रीमती. सीताबाई तुकाराम पालकर २) श्री. सदानंद तुकाराम पालकर ३) श्री. अमोल तुकाराम पालकर ४) श्री. अमर तुकाराम पालकर सर्व रा. केवाळे ता. पनवेल जि. रायगड यांच्यानावे अधिकार अभिलेखी नमूद असलेल्या भोगवटाधारकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. जिचे सविस्तर वर्णन खालील परिशिष्टामध्ये केलेले असून, यापुढे या जमिनीस संक्षिप्तपणे ’सदरहू मिळकत’ असे उल्लेखलीले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे. केवाळे, ता. पनवेल, जि. रायगड**

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर. पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ३० | १ | ०-२४-२० | १.४४ |
| | | पो.ख. ०-०२-५० | |
| | | एकूण ०-२६-७० | |

तरी वरील सदरहू मिळकतीबाबत, अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, इजमेंट, समझोता करार, साठेकरार, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांच्या आत, खाली सही करणार, खरेदीदारांचे वकील यांच्या खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह, लेखी हरकती रजिस्टड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे, मुदतीत हरकती प्राप्त न झाल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे, असे समजून आमचे अशील सदर मिळकती संदर्भातील सर्व व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

**दिनांक : १७/१०/२०२४**

**सही /-**
**ॲड. सदिच्छा दिलीप अस्वले,**
२०३, मोहिनील अपार्टमेंट,
नवे पोपुड, म्हातवली, उरण,
रायगड पिन कोड- ४००७०२
मोबाईल नं. ७६६६०१०२९३

MAHATRANSCO

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-57/24-25 7000034126 | Work of chemical resistant coating of ICT at 220kV Apta, 220kV Taloja & 100kV Thal substation, under EHV (O&M) Dn. Panvel under EHV (O&M) Circle, Panvel. Tender Fee **Rs. 500/- +GST** | **Rs. 32.50 Lakhs** |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 14.10.2024 to 21.10.2024 up to 11:00 hrs, Opening date:-21.10.2024 @ 11:30 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** **Contact Person:** The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9769006131 E-mail ID **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध उपक्रम

## वेळेचा सदउपयोग करा –प्रवीण दवणे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनातील अमूल्य असा वेळेचा सदुपयोग करावा, असे प्रतिपादन ज्येष्ठ सुप्रसिद्ध साहित्यिक प्रवीण दवणे यांनी आधार हॉस्पिटल आयोजित निबंध स्पर्धा बक्षीस समारंभाच्या वितरणावेळी केले.



या वेळी व्यासपीठावर डॉ. मिलिंद पराडकर, डॉ.संतोष पांढरे उपस्थित होते. पनवेलमधील सुप्रसिद्ध आधार हॉस्पिटलचे डॉ.मिलिंद पराडकर व डॉ. संतोष पांढरे यांच्या संकल्पनेतून आरोग्यम धनसंपदा या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित केली होती या स्पर्धेत पाचशे हुन अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेच्या बक्षीस वितरणावेळी प्रमुख पाहुणे म्हणून साहित्यिक प्रवीण दवणे उपस्तिथ होते. या वेळी दवणे यांनी विधार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करीत पालकांचे हि कानीं आपल्या साहित्यिक भाषेत टोचले विद्यार्थ्यांच्या बदलेल्या जीवन शैलीस पालक हि तितकेच जबाबदार असल्याचे सांगितले.

या वेळी डॉ. मिलिंद पराडकर व डॉ संतोष पांढरे यांनी आधार हॉस्पिटलची माहिती देऊन आजार होण्यापूर्वी कोणती काळजी नागरिकांनी घ्यावी याबाबत मार्गदर्शन केले.

या वेळी आधार हॉस्पिटलचे दीपक भोपी, जनसंपर्क अधिकारी धीरज गायकवाड, पालक वर्ग विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र खामकर यांनी केले.

## 'पिल्लई'मध्ये राष्ट्रीय कार्यक्रम; ५८ कॉलेजांचा सहभाग

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी येथील महात्मा एज्युकेशन सोसायटीच्या पिल्लई एचओसी कॉलेज ऑफ आर्किटेक्चरने प्रतिष्ठित काउंसिल ऑफ आर्किटेक्चर अवॉर्ड्स फॉर एक्सलन्स इन आर्किटेक्चरल थीसिस २०२४ आणि एक्सलन्स इन डॉक्युमेंटेशन ऑफ आर्किटेक्चरल हेरिटेज २०२४ चे आयोजन केले होते. यात सुमारे ५८ कॉलेजांचा समावेश होता.



तीन दिवसीय कार्यक्रम रसायनी पिल्लई कॅम्पसमध्ये आयोजित करण्यात आला होता. स्पर्धेच्या सर्व श्रेणींमध्ये सुमारे १३९ नोंदणी झाली होती. इव्हेंटमध्ये अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या प्रबंध कार्याचे प्रदर्शन समाविष्ट होते, प्रत्येक सहभागी महाविद्यालयाने स्पर्धेसाठी त्यांच्या सर्वोत्कृष्ट प्रवेशिका पाठवल्या होत्या. १० निवडलेल्या विद्यार्थ्यांचे सार्वजनिक सादरीकरण आणि शैक्षणिक आणि सराव आर्किटेक्ट्सचे ज्युरी मूल्यांकन झाले.

ज्युरीमध्ये हैदराबादचे आर्किटेक्ट राम मोहन राव, आर्किटेक्ट मीता जैन आणि आर्किटेक्ट नागेश एचडी यांसारख्या प्रख्यात वास्तुविशारदांचा समावेश होता. सार्वजनिक प्रदर्शन आणि ज्युरींना जबरदस्त प्रतिसाद मिळाला जिथे सुमारे ५०० हून अधिक लोक कार्यक्रमाला उपस्थित होते.

संपूर्ण ज्युरी प्रक्रियेचे संयोजन आर्किटेक्ट प्रा. जयश्री देशपांडे यांनी आर्किटेक्ट अनिरुद्ध पॉल आणि वास्तुविशारद प्रा. नीती त्रिवेदी यांनी केले. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे आर्किटेक्ट प्रा. अभय विनायक पुरोहित आणि वास्तुविशारद गजानंद राम यांसारख्या मान्यवरांची उपस्थिती होती.

महात्मा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष आणि सीईओ, डॉ. के. एम. वासुदेवन पिल्लई आणि सचिव, डॉ. डॅफ्ने पिल्लई हेही उपस्थित होते.

## उलवे येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, संगणक वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल समालोचक असोसिएशन यांच्या माध्यमातून रायगड जिल्हा परिषद शाळा उलवे येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व शाळेकरिता संगणक वाटप करण्याचा कार्यक्रम झाला. यामध्ये जिल्हा परिषद शाळेचे संपूर्ण विद्यार्थ्यांनी संधीचा लाभ घेतला. तसेच पहिली ते सातवी वर्गातील प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करून अभ्यासाचे टेबल भेटवस्तू देण्यात आले.

पनवेल समालोचक असोसिएशन संस्थापक– संदीप वास्कर यांच्या माध्यमातून पनवेल प्रीमियर लीग भरवली जाते. शाळा व्यवस्थापन समिती उलवे येथील शिक्षण तज्ञ– नामदेव गायकवाड ग्रामपंचायत सदस्य पुंडलिक म्हात्रे, अनघा पिंपरकर, सुप्रिया म्हात्रे, संदीप ठाकूर, प्रियंका मढवी, धनाजी जामकर सह अन्य पदाधिकारी उपस्थित होते. अध्यक्ष किरण पाटील, उपाध्यक्ष योगेश मडवी, सचिव संतोष घरत, सदस्य रोशन पाटील, प्रवीण टेंबे, वैभव भोपी, अलंकार पाटील, प्रवीण गायकर यांच्यामार्फत या नफ्यातून गरजू लोकांना जीवनावश्यक वस्तू तसेच विद्यार्थ्यांना शाळेची बॅग, वह्या, पुस्तके, छत्री, क्रीडाचे साहित्य शैक्षणिक साहित्य देण्यात आले आहे. आज जिल्हा परिषद शाळा उलवे येथे विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी दोन संगणक देण्यात आले.

याआधी खारघर पेठ, मोरावे, वावंजे, अशा अनेक भागातील गरजू लोकांना या असोसिएशनच्या माध्यमातून समजसेवा करण्यात आली आहे तसेच आदिवासी भागात जीवन आवश्यक घरगुती वस्तू वाटप केले आहेत.

## आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

शिवशाही प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य व युवा फ्रेंड्स् सर्कल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पाताळगंगा अतिरीक्त एमआयडीसी लगतच्या डोंगराळ भागातील वडमाळवाडी येथे शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाला.



या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून शिवशाही प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष राज गोविंद जाधव साहेब उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात शिवशाही प्रतिष्ठान रायगड जिल्हा अध्यक्ष यश इंगवले यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून शिवशाही प्रतिष्ठान रायगड जिल्हा संघटक नितेश देशमुख यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

शिवशाही प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष राज गोविंद जाधव हे यांच्या हस्ते कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. वडमाळवाडी शाळेचे शिक्षक मंगेश कांबळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. सामाजिक कार्यकर्ते महाराष्ट्रभूषण पत्रकार कैलासराजे निर्मला कमलाकर घरत संस्थापक अध्यक्ष युवा फ्रेंडस सर्कल फाउंडेशन यांच्या नियोजनातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अंकुर प्रकल्प फील्ड ऑफिसर राजेश रसाळ यांनी उपस्थित पाहुण्यांचे आभार मानले.

प्रास्ताविक कैलासराजे यांनी केले. या वेळी जिते केंद्र प्रमुख मुकुंद पाटील उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवतेज युवा फाउंडेशनचे अध्यक्ष हेमंत पाटील होते तर खारेपाट विकास संकल्प संघटना आंदोलनकर्ते भूमिपुत्र सामाजिक संघटना विठ्ठलवाडी पदाधिकारी अभिमन्यू म्हात्रे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या माधुरीताई घरत, सुचित्रा ताई समेळ, वडमाळवाडीमधील विद्यमान ग्रामपंचायत सदस्या अनिता वाघे, ग्रूप ग्रामपंचायत दुष्मी खारपाडा माजी सरपंच सविता वाघे उपस्थित होत्या. शिवशाही प्रतिष्ठान सोशल मीडिया रायगड जिल्हा अध्यक्ष साहिल इंगवले, लक्ष्मण पाटील, साहिल थळे पदाधिकारी व्यासपिठावर उपस्थित होते.

हा कार्यक्रमासाठी रा.जि.प.प्राथमिक शाळा वडमाळवाडी शिक्षिका जानकी येवले मॅडम, रा.जि.प.प्राथमिक शाळा खैरासवाडी शिक्षक अनिल घाडगे सर सर्व शिक्षक वृंद आणि विद्यार्थी मित्रांचे मोलाचे सहकार्य लाभले.

रा.जि.प.प्राथमिक शाळा खैरासवाडी व वडमाळवाडी या शाळांच्या एकूण ५० विद्यार्थ्यांना प्रत्येकी कंपास बॉक्स आणि रजिस्टर वही देण्यात आली.

## उरणच्या युईएस कॉलेजमध्ये पुस्तक प्रदर्शन

**उरण : वार्ताहर**

माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या जयंतीप्रित्यर्थ युईएस कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अॅण्ड टेक्नॉलॉजीमध्ये मंगळवारी (दि.१५) वाचन प्रेरणा दिनानिमित्त पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन केले होते.



युईएस संस्थेचे अध्यक्ष आर्किटेक्ट तनसुख जैन यांनी पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन केले व त्यानंतर डॉ.ए.पी. जे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार घातले. या वेळी संस्थेचे उपाध्यक्ष मिलिंद पाडगांवकर, ज्येष्ठ सदस्य व खजिनदार चंद्रकांत ठक्कर, सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या, स्कूल व ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या, सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख तसेच प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका व शिक्षक उपस्थित होते.

डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांनी स्वत: लिहिलेल्या तसेच त्यांच्याबद्दल इतर लेखकांनी लिहिलेल्या मराठी, हिंदी व इंग्रजी तसेच वेगवेगळ्या विषयांवरील पुस्तकांचे प्रदर्शन मांडले होते. तसेच वाचन प्रेरणा दिन ह्या विषयावर विद्यार्थ्यांसाठी कविता लेखन, भित्तीपत्र बनविणे, रांगोळी व वक्तृत्व स्पर्धा अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. ज्याला विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद लाभला.

## विशेष मुलांनी बनविल्या आकर्षक पणत्या

**उरण : वार्ताहर**

दीपावली या सणाला थोडेच दिवस राहिल्याने दीपावली सणाला लागणाऱ्या वस्तू बनविण्याचे काम दर वर्षाप्रमाणे यंदाही उरण शहरतील उरण नगर परिषद हद्दीतील बोरी नाका, स्वातंत्र्य सैनिक दत्ता रहाळकर मैदानाजवळ असलेल्या स्वामी ब्रह्मानंद प्रतिष्ठानतर्फे चालवित असलेल्या सीबर्ड स्वीकार विशेष मुलांच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी दिवाळीसाठी आकर्षक पणत्या बनविल्या आहेत.



या पणत्या २० ते १०० रुपये दोन नग दराने विकल्या जात आहेत. सुगंधी उटणे पाच ग्राम १५ रुपये पाकीट अशा दराने विकल्या जात आहेत.

शाळेतील विद्यार्थी दरवर्षी राख्या, पणत्या, तोरण, पाकीट, आहेर पाकीट, कागदी पिशव्या बनवित असतात. विशेष मुलांनी तयार केलेल्या वस्तूंना सेंटमेरी, ओएनजीसी, युईएस, द नर्चरिंग रूट, डीपी वर्ड कंपनी यांच्याकडून मागणी असते. या उपक्रमासाठी शाळेच्या सुपरवायझर माधुरी उपाध्ये, पल्लवी परदेशी, मानसी पांचाळ, राकेश म्हात्रे, प्रशांत कदम,

कलागुणांना मिळतोय वाव

१ सप्टेंबर १९९९ रोजी बेलापूर येथील शिरीष पुजारी यांनी उरण येथे अवघ्या पाच मुलांपासून विशेष मुलांसाठी शाळा सुरू केली होती. आज या शाळेत ४० विद्यार्थी शिकत आहेत. शाळेत एकूण तीन वर्ग असून तीन शिक्षकतीन कर्मचारी आहेत.

शाळेच्या पर्यवेक्षक माधुरी उपाध्ये यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक वर्ग मुलांच्या कलागुणांना वाव देण्याचा चांगल्या प्रकारे प्रयत्न करीत आहेत. गणेश जाधव, साक्षी दांडेकर, अस्मिता भोईर, गोपाळ म्हात्रे, सुहास ठाकूर, स्मिता वावरे आदी मेहनत घेत आहेत.

## रसायनीतील दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

निर्मला फाउंडेशन गुळसुंदे यांच्या वतीने रसायनी परिसरातील गुळसुंदे हायस्कूल, आपटे विद्यालय, सावळे विद्यालय, चावणे विद्यालय, वाशिवली विद्यालय, जनता विद्यालय मराठी माध्यम व इंग्रजी माध्यमिक विद्यालय, रिलायन्स फाउंडेशन स्कूल या शाळांतील एस.एस.सी परीक्षा २०२४मधील प्रथम तीन क्रमांक प्राप्त २७ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



या कार्यक्रमासाठी अध्यक्ष साई गावचे उद्योजक रमाकांत मोकल, प्रमुख पाहुणे एम.पी.ए.एस.सी.कॉलेज पनवेल चे प्राध्यापक डॉ. अनिल पालवे, विशेष सन्मानित अतिथी डॉ.अनुजा चंद्रकांत पाटील, डॉ. जीवन भोजने, विश्वास कोरडे, निर्मला पाटील, पांडुरंग पाटील, जितेंद्र गाताडे, संदीप माळी, सुनील पाटील, चंद्रकांत पाटील, मुख्याध्यापक कांबळे सर, मुख्याध्यापक झिंगे सर आदी उपस्थित होते.

निर्मला फाउंडेशनचे अध्यक्ष अनिल पाटील यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा हेतू सांगितला तसेच विद्यार्थ्यांना कौतुकाची शाब्बासकी दिल्याने विद्यार्थी अधिक जोमाने प्रगती करून आपल्या पुढील आयुष्यात यशस्वी होतील हा विश्वास मांडला. डॉ. अनुजा पाटील यांनी उत्तम शिक्षण घेण्यासाठी मार्गदर्शन कसे घेतले पाहिजे याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. जीवन भोजने यांनी शिक्षण घेत असताना कितीही कठीण प्रसंग आले तरी आपण आपले ध्येय कसे पूर्ण करावे यावर मार्गदर्शन केले.

डॉ. अनिल पालवे सर यांनी विद्यार्थ्यांना आयुष्यामध्ये यशस्वी होण्यासाठी पंचसूत्र स्मार्ट कशाप्रकारे सहकार्य करेल याविषयी विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन केले. चावणे विद्यालयाचे मुख्याध्यापक पद्माकर झिंगे यांनी निर्मला फाउंडेशनच्या या उपक्रमाबद्दल त्यांचे कौतुक केले तसेच विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे आभार निर्मला फाउंडेशनचे सचिव प्रशांत पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे निवेदन रूपाली पाटील यांनी केले. या संपूर्ण कार्यक्रमासाठी विकास पाटील, रूबेन पाटील, कल्पना पाटील, प्रियंका पाटील, वृषाली ठोंबरे यांनी सहकार्य केले.

दरम्यान, निर्मला फाउंडेशन गुळसुंदे वर्षभर विविध सामाजिक तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने उपक्रम राबवित असते. या उपक्रमांना परिसरातील नागरिकांचा चांगला सहभाग लाभतो.

## नाईक महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिनानिमित्त कार्यक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

कोपरखैरणे येथील श्रमिक शिक्षण मंडळाचे एफ. जी .नाईक महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळ व ग्रंथालय समिती तसेच राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमानाने वाचन प्रेरणा दिनांनिमित्त चला पुस्तके वाचूया, स्वतःला घडवूया! या कार्यक्रमाचे व ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख अतिथी व वक्ते एफ.जी .नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य प्रताप महाडिक यांच्या हस्ते करण्यात आले. महाविद्यालयाचे समन्वयक डॉ. दत्तात्रय घोडके, विज्ञान (आय.टी) विभाग प्रमुख प्रा. स्मृतिगंधा बिडकर, डॉ. प्राजक्ता पाटील, मराठी वाङःमय मंडळ प्रमुख प्रा. सीमा शिंदे, ग्रंथालय समिती प्रमुख जयश्री मोरे, सहाय्यक ग्रंथपाल विजय शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमाधिकारी डॉ. कविता पवार, प्रा. प्रमोद साळुंखे इतर सर्व शिक्षक, समिती सदस्य, आदी उपस्थित होते.

कार्यक्रमावेळी सहाय्यक ग्रंथपाल विजय शिंदे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत वाचनाची कला कशी जोपासावी याचे मार्गदर्शन केल. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी व वक्ते महाविद्यालयाचे प्राचार्य प्रताप महाडिक यांनी आपल्या ग्रंथालयात विद्यार्थ्यांना वाचनासाठी विविध सुविधा उपलब्ध आहेत व त्याचा उपयोग विद्यार्थ्यांनी स्वतःच्या विकासासाठी करावा, असे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

विद्यार्थ्यांनी ग्रंथ प्रदर्शन, पुस्तक अभिप्राय, अभिवाचन, समूहवाचन या विविध उपक्रमांत सहभाग घेऊन कार्यक्रम उत्साहात साजरा केला. सूत्रसंचालन तृतीय वर्ष विज्ञान (आय.टी) शाखेची विद्यार्थिनी वैष्णवी पिसाळ यांनी केले, तर या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मराठी वाङःमय मंडळ प्रमुख प्रा. सीमा शिंदे यांनी केले.



# यंदाही ‘माथेरानची राणी’ उशिराने धावणार

**परतीच्या पावसाचा परिणाम**



**माथेरान : प्रतिनिधी**

पावसाळी चार महिन्यांच्या सुट्टीवर गेलेली येथील नागरिकांची आणि पर्यटकांची आवडती माथेरानची राणी अर्थात मिनीट्रेनची डेडलाईन चुकली असून ती यंदाही उशिरा धावणार अशी चिन्ह दिसत आहेत. १५ जून ते १५ ऑक्टोबर अशी चार महिने बंद असलेली नेरळ-माथेरान-नेरळ मिनीट्रेन यावर्षीदेखील उशिराने आपल्या नियोजित वेळेनुसार सुरू न झाल्याने स्थानिक नागरिकांनी आणि पर्यटकांनी येथे नाराजी व्यक्त केली आहे.

मुंबई, पुण्यातील पर्यटकांना सर्वात जवळचे, निसर्गाने नटलेले सुंदर असे थंड हवेचे ठिकाण म्हणजे माथेरान-नेरळ-माथेरान-नेरळदरम्यान नॅरोगेजवर धावणारी मिनीट्रेन ही माथेरानची राणी म्हणून प्रसिद्ध असून पर्यटकांसाठी खास आकर्षण केंद्र आहे. ही मिनीट्रेन पर्वतीय क्षेत्रात धावणाऱ्या दर्जालिंग मिनीट्रेनच्या धर्तीवर याठिकाणी चालविली जाते.

दरवर्षी पावसाळी चार महिने मिनीट्रेन बंद केली जाते, मात्र या वर्षी १५ ऑक्टोबर या आपल्या नियोजित वेळेत मिनीट्रेन सुरू झाली नसल्याने माथेरान नागरिकांचा व पर्यटकांचा येथे हिरमोड झाला असून त्यांनी आपली नाराजी व्यक्त केली.

नेरळ-माथेरान-नेरळ या २१ किलोमीटरच्या घाटरस्त्यामध्ये अजूनही नॅरोगेज मार्ग दुरुस्तीची कामे सुरू आहे. नेरळहून दररोज एक मालगाडी याठिकाणी चालवली जाते, मात्र प्रवासी वाहतूक अजून सुरू केली नाही. याबाबत रेल्वे प्रशासनाकडे विचारणा केली असता सध्या तरी आमच्याकडे कोणतीही माहिती नसल्याचे सांगण्यात आले.

यंदा ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात दिवाळी हंगाम सुरू होत असून त्याच्या अगोदरच मिनीट्रेनचा प्रवासी हंगाम याठिकाणी सुरू झाला पाहिजे, अन्यथा याचा परिणाम येथील दिवाळी हंगामावर होईल आणि त्याचा फटका व्यावसायिकांना बसणार आहे.

> माथेरान मिनीट्रेन १५ ऑक्टोबरला सुरू होणे अपेक्षित होते, परंतु परतीचा पाऊस सुरू असल्याने मिनीट्रेन या ठिकाणी सुरू होऊ शकली नाही अशी माहिती मिळत आहे. दिवाळी हंगाम लवकर असल्याने नेरळ-माथेरान-नेरळ मिनीट्रेन लवकरात लवकर सुरू झाली पाहिजे. मागील वर्षीप्रमाणे नोव्हेंबर मध्ये सुरू झाल्यास याचा परिमाण येथील पर्यटन व्यवसायावर होईल.
>
> **-प्रवीण सकपाळ**, शहर अध्यक्ष, भाजप माथेरान

> दसरा विकेंडला आम्ही सहकुटुंब माथेरानला आलो होतो. मिनीट्रेनच्या प्रवासासाठी नेरळ स्थानकात गेलो असता समजले की, अजून गाडी सुरू झाली नाही. यापूर्वी दसऱ्याच्या मुहूर्तावर मिनिट्रेन सुरू होत होती.
>
> **-निक्की गोम्स**, पर्यटक, मुंबई

# निवडणूक पत्रक किंवा भित्तीपत्रकाच्या दर्शनी भागावर मुद्रक आणि प्रकाशकाचे नाव बंधनकारक

**रायगड : रामप्रहर वृत्त**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४च्या अनुषंगाने लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५१चे कलम १२७-क नुसार कोणत्याही व्यक्तीला, निवडणूक पत्रक किंवा भित्तीपत्रकाच्या दर्शनी भागावर मुद्रक आणि प्रकाशकाचे नाव आणि पत्ता नमूद करणे बंधनकारक आहे, अन्यथा कोणतेही पत्रक अथवा भित्तीपत्रक मुद्रित वा प्रकाशित करता येणार नाही.

निवडणुकीसाठी असणारी पत्रके, छापील साहित्य यावर प्रकाशक आणि मुद्रक यांची नावे असणे आवश्यक आहेत. कोणत्याही व्यक्तीला निवडणूक पत्रक किंवा भित्तीपत्रक ती स्वतःच त्याचा प्रकाशक आहे याबद्दलचे त्याने स्वतः स्वाक्षरी केलेले व त्यावर दोन ओळखणाऱ्या व्यक्तींनी साक्षांकित केलेले अधिकथन मुद्रकास दिल्याशिवाय मुद्रकाने मुद्रण करू नये.

निवडणूक पत्रक किंवा भित्तीपत्रक प्रकाशित करणाऱ्या व्यक्तीने कार्यवाही केल्यावर आणि मुद्रकाने मुद्रण केल्यानंतर मुद्रित साहित्याची प्रत जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी रायगड तसेच संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे पाठवावी, अन्यथा संबंधित मुद्रणालयाचा परवाना रद्द करण्यासह कठोर कारवाई करण्यात येईल.

निवडणूक पत्रक किंवा भित्तीपत्रकाचा अर्थ उमेदवाराच्या प्रचारासाठी वाटण्यात आलेले मुदतपत्रक, हस्तपत्रक किंवा अन्य दस्तऐवज किंवा निवडणुकीशी संबंधित असा घोषणाफलक किंवा भित्तीफलक असा आहे. या निर्बंधाचे व्यतिक्रमण करणाऱ्या व्यक्ती सहा महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा दोन हजार रुपयापर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षास पात्र असेल.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ लढविणारे उमेदवार, राजकीय पक्ष तसेच मुद्रणालय चालक यांनी या सूचनांची नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

# मुरूडमध्ये बौद्ध धम्म जाहीर मेळावा उत्साहात

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड अलंकापुरीजवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक उभा व्हावे, अशी मागणी बौद्ध समाजाकडून होत होती. मी शब्द दिला होता तो शब्द पूर्ण झाला आहे, असे प्रतिपादन आमदार महेंद्र दळवी यांनी बौद्ध धम्म जाहीर मेळाव्यात केले.



या वेळी जगदीश गायकवाड, भरत बेलोसे, स्नेहा पाटील, तृप्ती पाटील, किशोर शिंदे, धर्मेश मोरे, अशोक धुमाळ आदींसह शेकडो बौद्ध समाजाचे बांधव, भगिनी उपस्थित होते.

केंद्रीय समिती अध्यक्ष किशोर शिंदे यांनी, आमदार महेंद्र दळवी यांनी आमचे स्वप्न पूर्ण केले. याची पोचपावती म्हणून बौद्धसमाजाकडून आमदारांना पूर्ण पाठिंबा जाहीर करण्यात आला.

आमदार महेंद्र दळवी पुढे म्हणाले की, बौद्ध समाजाला ४० वर्षे विरोधकांनी फसवले, खोटे आश्वासन देत राहिले. मी जो शब्द दिला तो पुर्ण करण्याची धमक माझ्यात आहे. प्रत्येक समाजाला न्याय देण्याचा काम मी करीत आलो आहे. जो करतो तो समाजासाठी करतो आणि करत राहणार आहे. स्मारकासाठी निधी कमी पडून देणार नाही. हे स्मारक पर्यटनासाठी मार्गदर्शक ठरेल.

# वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्या वाढली आहे. अशा वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मंगळवारी (दि.१५) वाहतुकीचे नियमभंग करणाऱ्या एकूण ३६० चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून तीन लाख ४८ हजार ४०० रुपये इतका दंड आकारला आहे. त्यामुळे बेदरकार वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.

# रातवड गावामध्ये वीरगळ स्मारकाचे लोकार्पण



**माणगाव : प्रतिनिधी**

दुर्गवीर प्रतिष्ठान मुंबई या संस्थेने उभारलेल्या रातवड येथील वीरगळ स्मारकाचे लोकार्पण माजी सैनिक गोपीचंद उतेकर यांच्या हस्ते आणि इतिहास अभ्यासक सुखद राणे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

प्राचीन कालखंडातील वीरांच्या दूर्मिळ प्रकारातील वीरगळ जतन करण्याच्या हेतूने दुर्गवीर प्रतिष्ठान संस्थेने रातवडची ग्रामदेवता रातुआईच्या मंदिराशेजारी आणि मुंबई-गोवा महामार्गालगत हे भव्य स्मारक उभारले आहे. यात पाच वीरगळांचा समूह असून त्यांना रासायनिक प्रक्रियेतून संवर्धन केले आहे. दुर्गवीर प्रतिष्ठान संस्थेने स्वखर्चाने वीरगळ स्मारक बांधले असून रायगड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील शिवभक्त आणि वीरगळ संशोधकांसाठी आकर्षण ठरणार आहे. लोकार्पण सोहळ्याप्रसंगी इतिहास अभ्यासक सुखद राणे यांनी उपस्थितांना आपला अलौकिक वारसा जतन करण्यासाठी आवाहन केले.

दुर्गवीर प्रतिष्ठानचे रायगड जिल्हाप्रमुख रामजी कदम यांनी वीरगळांबद्दल सविस्तर माहिती आणि स्मारकाचे प्रयोजन मनोगतातून व्यक्त केले, तसेच दुर्गवीर प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष हसुरकर यांनी संस्थेच्या गडसंवर्धन कार्याबद्दल माहिती सांगितली. वीरगळ स्मारक लोकार्पण सोहळ्याप्रसंगी रातवड उपसरपंच सतीश पवार, निवृत्त पोलीस अधिकारी सुदेश पालकर, रातुआई मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष विलास पालकर, माजी उपसरपंच शरद पालकर, ग्रामपंचायत सदस्या सीमा आईत दुर्गवीर प्रतिष्ठानचे सचिव सागर टक्के, उपाध्यक्ष रविंद्र रावराणे, महेशस्वामी जंगम, आम्ही सह्याद्रीचे शिलेदार संस्थेचे अध्यक्ष प्रफुल्ल करकरे तसेच रातवड ग्रामस्थ उपस्थित होते.

# साळाव पुलाचे भूमिपजन उत्साहात



**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवस रेड्डी सागरी महामार्गात असलेल्या कुंडलिका समुद्रखाडीवरील अलिबाग व मुरूड तालुक्याला जोडणारा रेवदंडा-साळाव पुलाचे नूतन पुलाच्या बांधकामाचा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे हस्ते दुरदृष्यप्रणालीद्वारे रविवारी (दि.१३)करण्यात आले.

या कार्यक्रमाचे थेट प्रसारण रेवदंडा मोठे बंदर येथील भंडारी समाज सभागृहात महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाचे वतीने आयोजित करण्यात आले होते. रेवदंडा सरपंच प्रफुल्ल मोरे यांचे प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी शिवसेना मुरूड उपतालुका प्रमुख भगिरथ पाटील, रेवदंडा ग्रामपंचायत सदस्य सुराराम माळी, ज्येष्ठ शिवसैनिक नारायण मुंबईकर, भारती मोरे, प्रसाद गोंधळी, महेंद्र घरत आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

रेवदंडा बायपास रस्त्यावर सरपंच प्रफुल्ल मोरे, त्यांच्या पत्नी भारती मोरे यांचे हस्ते श्रीफळ वाढवून व कुदळ मारून नियोजित रेवस रेड्डी सागरी महामार्गातील पुलाचा स्थानिक स्तरावर भूमिपूजन कार्यक्रम झाला. या कार्यक्रमासाठी राज्य विकास महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.अनिल कुमार गायकवाड व सहकारी यांनी परिश्रम घेतले.

# रोह्यात विश्वकर्मा योजना शिबिर

**धाटाव : प्रतिनिधी**

सुराज्य सामाजिक प्रतिष्ठान व वीर जिवाजी महाले सलून संघटना यांच्या विद्यमाने रोहातील नाभिक समाजासाठी प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना तसेच आयुष्यमान भारत, प्रधानमंत्री सुरक्षा विमा यांचे शिबिर सर्वसामान्य नागरिकांसाठी शासकीय विश्रामगृह रोहा येथे मंगळवारी (दि.१५) आयोजन करण्यात आले होते.

१९१ नागरिकांनी शिबिराचा लाभ घेतला. या वेळी वीर जिवाजी महाले सलून संघटनाचे अध्यक्ष समिर दिवेकर, उपाध्यक्ष रुपेश रावकर, सचिव पराग मोरे, खजिनदार प्रवीण खराडे, समीर जाधव, अजिंक्य खराडे, रुपेश खराडे, शुभम मोरे, नरेश मोहिते, मिलिंद सकपाळ हे उपस्थित होते.

रोहातील ५१ सलून व्यावसायिकांनी विश्वकर्मा योजनेसाठी नोंदणी केली.



# शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**रायगड** : राज्यांतर्गत व देशांतर्गत अभ्यासक्रमासाठी कर्जमर्यादा रू.१० लक्ष पर्यंत, परदेशी अभ्यासक्रमासाठी महत्तम कर्ज मर्यादा रू.२० लक्षपर्यंत शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना पूर्णपणे ऑनलाईन असून ज्या उमेदवारांना शैक्षणिक कर्ज योजनेचा लाभ घेण्यासाठी आपले अर्ज महामंडळाच्या www.msobcfdc.org या संकेतस्थळावर भरावेत असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक निशिकांत नार्वेकर यांनी केले आहे.

पात्रतेसाठी अर्जदाराचे वय १७ ते ३० वर्षे असावे, अर्जदार हा इतर मागास प्रवर्गातील असणे तसेच तो महाराष्ट्राचा रहिवासी असावा, कौटुंबिक वार्षिक उत्पन्नमर्यादा रू.८ लक्षपर्यंत असावी, अर्जदार हा इयत्ता १२ वी ६० टक्क्यांसह उत्तीर्ण असावा तसेच पदवीच्या व्दितीय वर्ष व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणारे विद्यार्थी ६० टक्के पदवीका उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. सिबील क्रेडीट स्कोअर किमान ५००पेक्षा अधिक असावा.

प्रस्तावासोबत अर्जदाराचा इतर मागास जातीचा दाखला, तहसिलदारांचा उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, अर्जदार व अर्जदाराचे पालक यांचे आधारकार्ड, ज्या अभ्यासक्रमासाठी शैक्षणक कर्ज आवश्यक आहे त्या अभ्यासक्रमासाठीची पात्रता परिक्षा उत्तीर्ण गुणपत्रिका, अर्जदार व अर्जदाराचे पालक यांचे पासपोर्ट फोटो, अर्जदाराचा जन्माचा/वयाचा पुरावा, शैक्षणिक शुल्क संबधित पत्र, शिष्यवृत्ती, शैक्षणिक शुल्कमाफी, पात्रतेबाबतचे प्रमाणपत्र, मान्यताप्राप्त संस्थेत प्रवेश घेतल्याचा पुरावा, आधार संलग्न बँक खाते पुरावा, तसेच इतर आवश्यक कागदपत्रे/ पुरावे असणे आवश्यक आहे.

# माणगाव तालुका कृउबा समिती सभापतीपदी भाजपचे महेश सुर्वे बिनविरोध

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी भाजपचे महेश गजानन सुर्वे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

दक्षिण रायगड भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांनी, शेतकऱ्यांची ही समिती असून शेतकऱ्यांचे हित पाहून निवडणूक बिनविरोध करण्यात आल्याचे सांगितले.

या समितीचे माजी सभापती रमेश मोरे यांनी आपल्या सभापती पदाचा राजीनामा दिला होता. यानंतर या रिक्त झालेल्या पदासाठी बुधवारी (दि.१६) सहाय्यक निबंधक सहकारी संस्था माणगावचे निवडणुकीचे पिठासन अधिकारी अमोल निरडे यांच्या अधिपत्याखाली ही निवडणूक पार पडली. या समितीच्या सभापतीपदासाठी भाजपचे महेश गजानन सुर्वे यांचा एकमेव नामनिर्देशन अर्ज दाखल झाल्याने ते बिनविरोध निवडून आल्याचे पिठासन अधिकारी अमोल निरडे यांनी जाहीर करून त्यांचे अभिनंदन केले. या वेळी उपसभापती अल्लाउद्दीन सनगे, संचालक हसनमिया बंदरकर, नरेश दळवी, दिलीप उतेकर, अ‍ॅड.कौस्तुभ धामणकर, गौरी पयेर, नाझनीन राऊत, सुषमा रिकामे, विनायक गिजे, चंद्रकांत गोरेगावकर, अंकुश गोळे, परशुराम पवार, स्वप्नील दसवते आदी संचालक उपस्थित होते. या सर्वांनीही नवनिर्वाचित सभापती महेश सुर्वे यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या. ज्येष्ठ नेते अस्लम राऊत, भाजपचे नेते संजयआप्पा ढवळे, श्रीवर्धन विधानसभा मतदार संघ प्रमुख प्रशांत शिंदे, माजी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, कृउबा समिती माजी सभापती संजय पंदेरे, तालुकाध्यक्ष गोविंद कासार, शिवसेनेचे तालुका प्रमुख गजानन अधिकारी, भाजपचे तालुका उपाध्यक्ष बाबुराव चव्हाण, होडगाव सरपंच बळीराम खाडे, बामणोली माजी सरपंच बाबू पाखुर्डे, ज्येष्ठ नेते गोविंद पवार, नामदेव शिंदे, चंद्रकांत सत्वे, राजेश कासारे, निजाम फोपळूणकर, स्वप्नील सकपाळ, देगाव उपसरपंच दिनेश गुगळे, मोर्बा माजी सरपंच विलास गोठल, माजी उपसरपंच अमोल मोहिते, मंदार मढवी, यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.



# थकबाकीदार लाभार्थींनी योजनेचा लाभ घ्यावा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळाच्या थकीत कर्ज रक्कम असलेल्या रायगड जिल्ह्यातील लाभार्थ्यांसाठी ओबीसी महामंडळाच्या थकीत कर्जप्रकरणात संपूर्ण थकीत कर्ज रकमेचा एकरकमी भरणा करणाऱ्या लाभार्थीस थकीत व्याज रकमेत ५० टक्के सवलत देण्याबाबतची एकरकमी परतावा योजना राबविण्यात येत आहे. त्यानुसार महामंडळाच्या थकबाकीदार लाभार्थीनी या योजनेचा लाभ घेऊन कर्जमुक्त व्हावे, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक निशिकांत नार्वेकर यांनी केले आहे. लाभार्थींना स्वयंरोजगाराकरीता अल्पव्याजदराने कर्ज वितरीत करण्यात आलेले आहे.

# गणित संबोध परीक्षेचा बक्षीस वितरण समारंभ

**मुरूड : प्रतिनिधी**

विज्ञान अध्यापक मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या गणित संबोध परीक्षेचा बक्षीस वितरण समारंभ श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय नांदगाव येथे झाला.

या कार्यक्रमसचे अध्यक्ष मुरूड पं. स.चे गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांनी भूषविले. या वेळी नांदगाव हायस्कूल मुख्याध्यापक अर्चना खोत, पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर, गणित अध्यापक मंडळाचे संदेश चोरघे, गणित संबोध परीक्षेच्या तालुकाप्रमुख मीनल मोरे, कोर्लई हायस्कूल सहशिक्षिका शुभांगी पंची, सुरेश मोरे, म्हात्रे सर, दत्ता खुळपे, निशा बिरवाडकर, नियती ठमके आदींसह सहभागी शाळांचे शिक्षक उपस्थित होते.



पहिल्या तीन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीदेखील प्रदान करण्यात आली. त्यामध्ये महात्मा गांधी विद्यामंदिर चोरढे येथील विद्यार्थिनी जेसिका जगदीश घाग, माउंट कारमेल हायस्कूल कोर्लईमधील विद्यार्थी स्वर सुहास मुरुडकर, श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय नांदगाव येथील विद्यार्थी आराध्य गजानन शहापूरकर यांना रोख रक्कम, प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.

गणित संबोध परीक्षेत नांदगाव हायस्कूलचे सर्वाधिक म्हणजे १६७ विद्यार्थ्यांना या परीक्षेला बसवल्याबद्दल श्री छत्रपती नूतन विद्यालय नांदगाव या हायस्कूलच्या मुख्यद्यापिका अर्चना उदय खोत यांचा गटशिक्षण अधिकारी सुनील गवळी यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन योगेश पाटील तर आभार महेश वाडकर यांनी केले.

# बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंद यांचा शिष्याकडून पराभव

## प्रज्ञानंदचा डब्लूआर चेस मास्टरच्या उपांत्य फेरीत प्रवेश

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा युवा बुद्धिबळपटू रमेश बाबू प्रज्ञानंदा याने डब्लूआर चेस मास्टर २०२४च्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. त्याने पाच वेळचे वर्ल्ड चॅम्पियन विश्वनाथ आनंद यांचा उपांत्यपूर्व फेरीत पराभव केला.

डब्लूआर चेस मास्टर २०२४च्या उपांत्यपूर्व फेरीत प्रज्ञानंदाने विश्वनाथन आनंद यांचा २-१ असा पराभव केला. दोघांमधील पहिले दोन खेळ अनिर्णित राहिले. त्यानंतर १९ वर्षीय प्रज्ञानंदने टायब्रेकमध्ये विजय मिळवला. आता उपांत्य फेरीत त्याचा सामना भारताच्याच अर्जुन एरिगॅसीसोबत होईल. अर्जुनने उपांत्यपूर्व फेरीत भारताच्या विदित गुजराथीचा पराभव करून उपांत्य फेरी गाठली आहे.



उपांत्यपूर्व फेरीपूर्वी प्रज्ञानंदाने मोल्डोव्हाच्या विक्टर बोलोगन यांचा पहिल्या फेरीत पराभव केला होता. या सामन्यात त्याने २-० असा विजय मिळवत उपांत्यपूर्व फेरी गाठली होती. स्पर्धेचा दुसरा उपांत्य सामना फ्रान्सचा मॅक्सिम वॅचिअर-लाग्रेव आणि अलिरेज फिरोजा यांच्यात होणार आहे. उपांत्य फेरीत विजय मिळवणारे दोन खेळाडू विजेतेपदाच्या लढतीत आमनेसामने येतील. आर. प्रज्ञानंदा २०१६ मध्ये वयाच्या १० वर्षे, १० महिने आणि १९ दिवसांत इतिहासातील सर्वात तरुण बुद्धिबळ आंतरराष्ट्रीय मास्टर बनला होता. त्यानंतर २०१८मध्ये बुद्धिबळ ग्रॅन्डमास्टर बनला. ही कामगिरी करणारा तो भारताचा सर्वात तरुण आणि जगातील चौथा सर्वात तरुण व्यक्ती ठरला.

# आंतरशालेय जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धांमध्ये ‘सीकेटी’ची बाजी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका आंतरशालेय जिल्हास्तरीय विविध मैदानी स्पर्धांमध्ये जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सीकेटी इंग्रजी माध्यम माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.



स्पर्धेमध्ये श्रेया बिरादर १४ वर्षांखालील मुलींच्या गटात ६०० मी धावणे द्वितीय आणि ४०० मी धावणे तृतीय, संश्रय नायर १४ वर्षांखालील मुलांच्या गटात लांब उडी द्वितीय आणि ४०० मी. रिले तृतीय, शौन पाटील १४ वर्षांखालील मुलांच्या गटात ६०० मी. धावणे तृतीय आणि ४०० मी. रिले तृतीय, स्मित नाईक १४ वर्षांखालील मुलांच्या गटात गोळा फेक तृतीय, सिद्धांत कांबळे १४ वर्षांखालील मुलांच्या गटात लांब उडी तृतीय आणि ४०० मी. रिले तृतीय, राज प्रजापती १४ वर्षांखालील मुलांच्या गटात ४०० मी. रिले तृतीय, सोनाक्षी पाटील १७ वर्षांखालील मुलींच्या गटात ४०० मी. धावणे प्रथम आणि ४०० मी. रिले तृतीय, अदिती प्रशांत कौचे १७ वर्षांखालील मुलींच्या गटात ४०० मी. रिले तृतीय, महेक राकेशकुमार साहू १७ वर्षांखालील ४०० मी. रिले तृतीय, स्वस्तीक भोसले १७ वर्षांखालील मुलांच्या गटात उंच उडी प्रथम, रितेश भगत १७ वर्षांखालील मुलांच्या गटात १०० मी. धावणे द्वितीय आणि तिहेरी उडी प्रथम, अनिकेत जाधव १७ वर्षांखालील मुलांच्या गटात तिहेरी उडी तृतीय यांनी यश संपादन केले.

खेळाडूंचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी गडदे, मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी अभिनंदन केले.

# आयएसएसएफ विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत कोल्हापूरच्या लेकीची कमाल



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोल्हापूरच्या सोनम मस्करने आयएसएसएफ विश्वचषक नेमबाजी स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी भारतासाठी अभिमानास्पद कामगिरी करीत १० मीटर एअर रायफल गटात रौप्यपदक पटकावले.

केवळ दोन वर्षांपूर्वी स्पर्धात्मक नेमबाजीला सुरुवात केलेल्या २२ वर्षीय सोनमला गेल्याच वर्षी राष्ट्रीय संघात स्थान मिळाले होते. अंतिम फेरीत सोनमने २५२.९ गुणांचा वेध घेतला.

चीनच्या हुआंग यूटिंगने २५४.५ गुणांसह सुवर्ण जिंकले. हुआंगने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये रौप्य जिंकले होते. त्याच वेळी आठ खेळाडूंच्या अंतिम फेरीतील अन्य भारतीय नेमबाज तिलोत्तमा सेनला सहाव्या स्थानी समाधान मानावे लागले.

पुरुषांमध्ये १० मीटर एअर रायफल गटात अर्जुन बबूताला पाचव्या स्थानी समाधान मानावे लागले. महिलांच्या १० मीटर एअर पिस्टलमध्ये ऑलिम्पियन सांगवानला चौथ्या स्थानासह थोडक्यात कांस्य पदकापासून मुकावे लागले.

## खांदा कॉलनीत महिलांसाठी वॉकेथॉन

**पनवेल** : पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिजन्मशताब्दी वर्षानिमित्ताने हिंदू नववर्ष समिती खांदेश्वर यांच्या वतीने महिलांसाठी वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे.

खांदा कॉलनी, सेक्टर ६मधील पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर उद्यान येथून रविवारी (दि.२०) सकाळी ६.३०वा. या वॉकेथॉनचा प्रारंभ होणार आहे. सर्व महिलांनी यामधे सहभागी होण्याचे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. यासाठी https://forms.gle/sKrnknNvYJe5njQ-7 या लिंकवर रजिस्ट्रेशन करावे. अधिक माहितीसाठी संपर्क ज्योती कोळी (९९६९०३२७४१), जयश्री कौलगे (७०२१०९५२६१), नेहा मुळीक (९९३०९७५३३९) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# मुंबई इंडियन्सला मिळाला नवा बॉलिंग कोच

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२५पूर्वी मुंबई इंडियन्सने संघात अनेक महत्त्वाचे बदल केले आहेत. फ्रॅन्चाईजीने नुकतीच महेला जयवर्धने यांची मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली. त्यांनी मार्क बाऊचरकडून ही जबाबदारी घेतली. त्यानंतर आता संघाने गोलंदाजी प्रशिक्षकदेखील बदलला आहे.

मुंबई इंडियन्सने आयपीएल २०२५पूर्वी पारस म्हांब्रे यांची नवे गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली. ते लसिथ मलिंगा याच्यासोबत ही जबाबदारी सांभाळतील. म्हांब्रे यापूर्वी राहुल द्रविड यांच्या



कार्यकाळात भारतीय क्रिकेट संघाचे गोलंदाजी प्रशिक्षक होते. २०२४ टी-२० विश्वचषकानंतर त्यांचा कार्यकाळ संपला. यानंतर आता ते मुंबई इंडियन्सशी जोडले गेले आहेत.

पारस म्हांब्रे यांची गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून नियुक्ती झाल्याची बातमी मुंबई इंडियन्सने आपल्या अधिकृत वेबसाईटवरून दिली. विशेष म्हणजे, पारस म्हांब्रे यापूर्वीही मुंबई इंडियन्सचे भाग होते. ते मुंबईसाठी देशांतर्गत सामन्यांमध्ये रिम-आर्म मध्यम वेगवान गोलंदाजाची भूमिका बजावत असे. त्यांनी टीम इंडियासाठी २ कसोटी आणि ३ एकदिवसीय सामने खेळले.

याशिवाय त्यांनी प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये २८४ विकेट घेतल्या आहेत, तसेच त्यांनी १०५ डावात १६६५ धावादेखील केल्या आहेत. क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर त्यांनी प्रशिक्षकाची भूमिका स्वीकारली.

# एचओसीएल स्कूलची टॅलेंट असेसमेंट सेंटर म्हणून निवड

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनीतील महात्मा एज्युकेशन सोसायटीच्या एचओसी इंटरनॅशनल स्कूलची प्रतिष्ठित किर्ती (खेलो इंडिया रायझिंग टॅलेंट आयडेंटिफिकेशन प्रोग्राम) साठी टॅलेंट असेसमेंट सेंटर म्हणून क्रीडा आणि भारतीय क्रीडा प्राधिकरण मंत्रालयाच्या अंतर्गत निवड करण्यात आली आहे.



प्रोजेक्ट किर्ती, युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाचा एक उपक्रम देशभरातील प्रतिभा शोधांना प्राधान्य देण्याचा असून विविध क्रीडा विषयांच्या विशिष्ट आवश्यकतांनुसार त्यांच्या खेळातील कामगिरीचे मापन करण्यासाठी संपूर्ण मूल्यांकनानंतर खेळाडूंना सर्वसमावेशक किर्ती रिपोर्ट कार्ड मिळणार आहे.

टॅलेंट असेसमेंट सेंटरकडून ओळखले जाणारे खेळाडू एलिट स्पोर्टिंग कार्यक्रमांसाठी फीडर चॅनेल म्हणून काम करतील, ज्यामुळे भारताच्या ऑलिम्पिक आकांक्षांना समर्थन मिळण्याचे काम होईल.

या कार्यक्रमांतर्गत ९ ते १२ वर्षे, १३ ते १५ वर्षे आणि १६ ते १८ वर्षे असे तीन वयोगट असणार आहेत. यासाठी मूल्यांकन आणि चाचणी व्हॉलीबॉल २० नोव्हेंबर, फुटबॉल २१ नोव्हेंबर, ॲथलेटिक्स २२ नोव्हेंबर, कबड्डी २३ नोव्हेंबर रोजी घेण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी (९३२३२५५६००), (८८९८७८२९७१) यावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# डेन्मार्क खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत सिंधूचा दुसऱ्या फेरीत प्रवेश



**ओडेन्स** : लक्ष्य सेनसह भारताच्या सर्व खेळाडूंचे आव्हान पहिल्याच फेरीत संपुष्टात येत असतानाच पी. व्ही. सिंधू डेन्मार्क खुल्या बॅडमिंटन स्पर्धेची (सुपर ७५० दर्जा) दुसरी फेरी गाठण्यात यशस्वी ठरली.

चायनीज तैपेईच्या पै यू पो हिने सिंधू विरूद्ध दुसऱ्या गेमला दुखापतीमुळे माघार घेतली. यामुळे सिंधूला विजयी घोषित करण्यात आले. अर्थात, पो हिच्या माघारीच्या निर्णयावेळी सिंधूचेच पारडे जड होते. सिंधूने पहिला गेम २१-८ असा जिंकला होता, तर दुसऱ्या गेममध्ये ती १३-७ अशी आघाडीवर होती.

पुरुष एकेरीत लक्ष्य सेनचा पराभव भारतासाठी धक्कादायक होता. लक्ष्यला पहिला गेम जिंकल्याचा फायदा उठवता आला नाही. तासाभराहून अधिक वेळ झालेल्या लढतीत लक्ष्यला चीनच्या लू गुआंगकडून २१-१२, १९-२१, १४-२१ असा पराभव पत्करावा लागला. व्हिएतनामच्या एन्गुयेन थुय लिन्हने चीन खुल्या स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत धडक मारणाऱ्या मालविका बनसोडचा २१-१३, २१-१२ असा पराभव केला.

# वेगवान गोलंदाजांच्या दुसऱ्या फळीची आता आवश्यकता -रोहित शर्मा



**बंगळुरु : वृत्तसंस्था**

भारतीय संघात फलंदाजांची मजबूत फळी सज्ज आहे. अशा वेळी वेगवान गोलंदाजांचीदेखील दुसरी फळी सज्ज असणे आवश्यक आहे. एखाद्या खेळाडूच्या कामगिरीवर अवलंबून राहण्याची वेळ येता कामा नये. संघात समतोल राखणे ही काळाची गरज असल्याचे मत भारताचा कर्णधार रोहित शर्माने व्यक्त केले.

सोमवारीच प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी गोलंदाजांचे महत्त्व विशद केले होते. त्याची दुसरी बाजू रोहितने समोर आणली. अलिकडच्या काळात क्रिकेट वाढले आहे. सातत्याच्या मालिकांमुळे खेळाडूंच्या दुखापतीचा प्रश्न संघांना भेडसावत आहे. अशा वेळी एखादा प्रमुख गोलंदाज जायबंदी झाला, तर संघाचा समतोल बिघडू शकतो. त्यामुळेच गोलंदाजांची दुसरी फळीदेखील सज्ज असायला हवी, असे न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यापूर्वी झालेल्या पत्रकार परिषदेत रोहितने सांगितले.

आपला मुद्दा अधिक स्पष्ट करताना रोहित म्हणाला, फलंदाजीसाठी जसे आता आमच्याकडे अनेक पर्याय उपलब्ध आहेत, तसेच गोलंदाजांच्या बाबतीत घडायला हवे. एक गोलंदाज खेळू शकला नाही, तर त्याच्या ताकदीचा दुसरा गोलंदाज असल्याची खात्री बाळगता यायला हवी. रोहितची पत्रकार परिषद ही प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्या वक्तव्याची दुसरी बाजू असल्याचे सातत्याने जाणवले. संघासाठी जो १०० टक्के योगदान देऊ शकतो अशा ११ खेळाडूंची निवड आम्ही करणार असे गंभीर यांनी सांगितले होते. रोहितने त्यांचाच मुद्दा जणू विस्ताराने मांडला. आम्ही काही व्यक्तींवर अवलंबून राहू शकत नाही.

# भारत-न्यूझीलंड सामन्याचा पहिला दिवस पावसामुळे वाया

**बंगळुरु : वृत्तसंस्था**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील बंगळुरु कसोटीतील पहिला दिवस पावसामुळे वाया गेला आहे. सामन्याच्या आधी बंगळुरुमध्ये जोरदार पाऊस झाला. बुधवारी जोर कमी झाला असला तरी पावसाची उघडझाप कायम असल्याचे चित्र दिसून आले. परिणामी पहिल्या दिवशी नाणेफेकीसाठीदेखील दोन्ही संघाचे कर्णधार मैदानात उतरु शकले नाहीत.

पहिल्या दिवसाचा खेळ वाया गेल्यानंतर ही कसर भरून काढण्यासाठी आता दुसऱ्या दिवशी सकाळी ८.४५ वा. टॉस घेण्यात येणार आहे. कसोटीतील गेल्या काही काळातील कल पाहिला तर कसोटी सामन्याचा निकाल लागण्यासाठी चार दिवसही पुरेसे ठरतात, हे दिसून आले आहे. त्यामुळेच भारत-न्यूझीलंड यांच्यातील पहिल्या कसोटीचा निकाल उर्वरीत चार दिवसांतही लागू शकेल, पण यासाठी किमान उर्वरित दिवसांचा खेळ होणं गरजेचे आहे. पावसाचा तोरा असाच राहिला तर मात्र गोष्टी अवघड होऊ शकतात.

बंगळुरुच्या स्टेडियमवरील ड्रेनेज यंत्रणा अर्थात मैदानातील पाण्याचा निचरा करणारी व्यवस्था सर्वोत्तम आहे. त्यामुळे पावसाच्या व्यत्ययानंतर मैदान पुन्हा खेळण्यायोग्य करण्याची मोठी समस्या इथे निर्माण होणार नाही, पण सामन्याआधी इथे जोरदार पाऊस झाल्यामुळे खेळपट्टीवर कव्हर टाकण्यात आले होते. कव्हर हटवल्यानंतर पुन्हा ग्राउंड्समन स्टाफला खेळपट्टीचे काम करावे लागेल. त्यांना यासाठी किमान तास ते दोन तासांचा वेळ लागणार होता.

पहिल्या दिवसाचा खेळ रद्द करण्यात आल्यामुळे त्यांना आवश्यक असणाऱ्या वेळापेक्षा अधिक वेळ त्यांना मिळेल, अशी अपेक्षा आहे.



# हरमनप्रीतच्या जागी नवा कर्णधार नेमण्याची वेळ

## वर्ल्डकपमधील खराब कामगिरीनंतर मिताली राजचे वक्तव्य

**मुंबई : प्रतिनिधी**

आयसीसी महिला टी-२० विश्वचषक २०२४मध्ये हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने प्रत्येक विभागात सर्वसाधारण कामगिरी करीत चाहत्यांना निराश केले. भारताच्या या पराभवानंतर भारताची माजी कर्णधार मिताली राज हिने टीम इंडियाच्या कर्णधारपदावर मोठे वक्तव्य केले आहे.

महिला विश्वचषक जिंकण्याचे स्वप्न घेऊन आलेल्या भारतीय संघाची सुरुवात खराब झाली आणि परिणामी भारताला विश्वचषकातील गट टप्प्यातून बाहेर पडावे लागले. भारतीय संघाला टी-२० विश्वचषक २०२४मध्ये पहिल्याच सामन्यात न्यूझीलंडविरुद्ध मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. यानंतर भारतीय संघाने पाकिस्तान आणि श्रीलंकेविरुद्ध विजय निश्चितच नोंदवला, मात्र त्यानंतर एका महत्त्वाच्या सामन्यात संघाला ऑस्ट्रेलियाविरुद्ध पराभवाला सामोरे जावे लागले. टीम इंडियाने ऑस्ट्रेलियाविरुद्ध जिंकत असलेला सामना गमावला.

भारताच्या खराब कामगिरीनंतर माजी कर्णधार मिताली राजने भारतीय निवड समिती कर्णधार बदलण्याचा विचार करत असेल तर त्यांनी आता हे पाऊल उचलले पाहिजे, असे म्हटले आहे. यासोबतच मितालीने भारतीय संघातील या दोन खेळाडूंपैकी एकाला कर्णधार बनवण्याचा सल्ला दिला आहे. निवडकर्त्यांना त्यात बदल करायचे असतील तर त्यांनी वेळ न घालवता कर्णधार बदलण्याची ही योग्य वेळ आहे. स्मृती तिथे आहे, पण मला वाटते जेमिमासारखी खेळाडू कर्णधारपदासाठी अधिक योग्य असेल. ती दीर्घ कालावधीसाठी संघाचे नेतृत्व करू शकते. ती सर्वांशीच बोलते आणि सामन्याबाबत चर्चाही करीत असते. या स्पर्धेत तिच्या कामगिरीने मला फारच प्रभावित केले आहे.

जीवेत् शरदः शतम्!
अजिंक्य घरत
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक
प्रविण चौधरी

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com